# दयानंद कला महाविद्यालयात कलावंत विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी ओढा

## स्टार प्रवाह फेम सायली टाक हिने घेतला अकरावीत प्रवेश



लातूर / प्रतिनिधी- १८ दयानंद कला महाविद्यालयाने सांस्कृतिक क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवापासून राष्ट्रीय युवक महोत्सवापर्यंत दयानंद कलाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कला नैपुण्याचा ठसा उमटविला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या परिक्षेत्रात विद्यापीठ स्तरीय युवक महोत्सवात सर्वाधिक वेळा सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करणारे दयानंद कला हे एकमेव महाविद्यालय आहे. अनेक भारतीय व पाश्चात्य वाद्यांची व अत्याधुनिक तंत्रज्ञाने संगीत विभाग सुसज्ज केलेला आहे.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी व सर्व संस्था सदस्यांच्या सहयोगाने गरीब, होतकरू व गुणवंत कलावंत विद्यार्थ्यांना लाखो रुपयांची शिष्यवृत्ती व पारितोषिके दिली जात आहे. याचाच परिपाक म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक कलावंत विद्यार्थी इयत्ता अकरावी संगीत, बी. ए. प्रथम संगीत व नाट्य शास्त्र आणि एम. ए. संगीत प्रथम वर्षासाठी प्रवेश घेत आहेत.

दयानंद कला महाविद्यालयातून अनेक खेळाडू, प्रशासकीय अधिकारी व कलावंत निर्माण झाले आहेत. दयानंदच्या संगीत व सांस्कृतिक विभागातून आज पर्यंत २७ विद्यार्थी हे दूरदर्शन व चित्रपट कलावंत झाले आहेत. राष्ट्रीय कला उत्सवातून अनेक चित्रकार विद्यार्थ्यांनी देशात सर्वप्रथम क्रमांक पटकावला आहे. परीक्षा पे चर्चा सारख्या कार्यक्रमातून आदित्य कुलकर्णी याने सहभाग नोंदविला आहे. अशा विविध उपक्रमामुळे दयानंद कला महाविद्यालयाने एक नवा सांस्कृतिक पॅटर्न निर्माण केला आहे.

कु. सायली टाक हिने स्टार प्रवाह वाहिनीवर मी होणार सुपर स्टार छोटे उस्ताद या रियालिटी शो मधून उपविजेतेपद पटकावले आहे. दहावी बोर्ड परीक्षेत तिने ९३.४० % गुण प्राप्त केले आहेत. अधिक गुण प्राप्त केल्यानंतर तिने अन्य शाखेत प्रवेश न घेता कला शाखा निवडली आहे. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे तिने इयत्ता अकरावीत प्रवेश घेतलेल्याबद्दल प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सायली व तिचे वडील सुनील टाक यांचे स्वागत व सत्कार केला. या प्रसंगी उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे, संगीत विभाग प्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी, डॉ. संदीपान जगदाळे हे उपस्थित होते.

# संजीवनी महाविद्यालयाचे एमएचटी-सीईटी परीक्षेत घवघवीत यश



चापोली / प्रतिनिधी- चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाने एमएचटी-सीईटी पीसीबी व पीसीएम २०२४ परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्याबद्धल सर्वस्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

संजीवनी महाविद्यालयातील गौरंगी सचिन मद्रेवार यांनी ९८.१८ गुण मिळवत महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. ओमकार शंकर डोंगरे यांनी ९७.२५ गुण मिळवत द्वितीय तर गिरीराज वैजनाथ मद्रेवार यांनी ८४.८८ गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच समीक्षा दशरथ मद्रेवार यांना ८१.९०, नम्रता नरेंद्र बलुरे यांना ८१.८४ गुण प्राप्त झाले आहेत. नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, विश्वनाथ शेटकर, डॉ. रामराव दुडीले, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, संजीवनी कनिष्ठ महाविद्यालायचे उपप्राचार्य रमेश गुट्टे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. नामदेव नलवाड, प्रा. विजय गुळवे, प्रा. डॉ. फुलचंद चाटे, प्रा. महेंद्र वळसंगीकर, प्रा. सौ संयोगिता बनसोडे, प्रा. सचिन साळुंके, प्रा. डॉ. अतुल धावारे, प्रा. डॉ. माधव कागणे, प्रा. गायकवाड, प्रा. नितीन आवस्कर, प्रा. बाबासाहेब घुले, प्रा. सौ कांबळे, प्रा. महेश कराड, प्रा. अशोक गुरमे, प्रा. वामन कराड, प्रा. इकबाल झिपरे, प्रा. शंकर डोंगरे, प्रा. नारायण खेडकर, प्रा. बजरंग केंद्रे, प्रा. सौ. मद्दे, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. निवृत्ती गोडभरले, प्रा. जयचंद भताने, प्रा. मनोज मुंढे सह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचार्यांनी अभिनंदन केले.

# संताजवळ काय मागावे हे कळले पाहिजे: समाधान महाराज शर्मा

**श्याम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी– मनुष्याला कुणाजवळ काय मागावे कधी मागावे कुठे मागावे कसे मागावे हे कळणे आवश्यक आहे आपण चाकरवाडी माऊली दादांच्या पावन समाधीस्थळी आलात तर काय मागाल माऊलींची कृपा मागा त्यांचा आशीर्वाद बघा त्यांच्याकडून सेवेची सातत्य रहावे हे मागा सेवेसाठी मला चाकरवाडीत येईल अशी व्यवस्था करा हेच मागा इथे येऊन माऊलींना संसाराची गाऱ्हाणी मांडू नका असे चिंतन प्रसिद्ध रामायणाचार्य ह भ प श्री समाधान महाराज शर्मा यांनी मांडले.

अत्यंत प्रभावी गोड आवाजात आणि माऊली भक्तांना एकरूप करणारी अशी राम कथा आपल्या ओजस्वी वाणीतून श्री समाधान महाराज शर्मा हे माऊलींच्या समाधीसनमुक पुण्यस्मरण सोहळ्यात सांगत आहेत समाधान महाराज यांच्या कथेसाठी माऊली भक्तांची प्रचंड संख्येने गर्दी होत आहे आज–काल संतांचे गुरुचे दर्शन हे आपल्या प्रापंचिक सुखासाठी आणि आपल्या कर्माने केलेल्या व झालेल्या उद्धवलेल्या समस्या निराकरणासाठी घेऊन अवास्तव अपेक्षा करण्याची वृत्ती ही परमार्थिक नाही शुद्ध परमार्थात प्रेम भक्ती सेवा दान परोपकार आणि शुद्ध आचरणाला महत्त्व आहे प्रभू रामाचे चरित्र हे माणसांचे उत्तम असे चारित्र्य घडवणारे आहे असे श्री समाधान महाराज म्हणाले मागताना ज्यांच्याकडे मुलगी नाही त्यांनी गरीब मुलगी पदरात घेऊन तिचे लग्न करावे कोणाला वाटते आपल्याला आई–वडील नाहीत पण असे वाटून घ्यायची गरज नाही आपण चाकरवाडीत आलात तर इथे आई आणि वडील एकाच स्वरूपात दिसतील त्या म्हणजे संजीवन समाधीत बसलेल्या गुरुवर्य माऊली दादा होत. कालच्या कथेत बालकांड अयोध्या कांड आणि केवट ची कथा महाराजांनी सांगितली. चाकरवाडी ही त्यागाची साधनेची नामस्मरणीची आणि सेवेची भूमी आहे इथे नामस्मरण व अन्नदान याचीच शिकवण व उपदेश आहे त्यावर आचरण करा आणि माऊलींच्या मनाला आनंद द्या जीवनात वेळेला महत्त्व आहे असे सांगितले.

## पत्रकार नवाब मोमीन यांचे निधन



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – शहरातील पत्रकार नवाब रियाजुद्दीन मोमीन यांचे दिर्घ आजाराने दि.१७ जून रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर धाराशिव शहरातील दर्गाह कब्रस्तानात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पत्नी, आई, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा परिवार आहे.

# एक खरी प्रेरणा डॉ. सुरेश तुळशीराम साळुंके यांचा जीवन प्रवास



**उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै. तुळशीराम ठाकूर यांचे सुपुत्र टाटा उद्योग समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर सुरेश तुळशीराम ठाकूर (साळुंके) यांना उत्कृष्ट व्यावसायिक कामगिरी आणि राष्ट्र उभारणीत योगदान दिल्याबद्दल भारत सरकारचा. २०२४ चा इंडियन अँचिव्हर्स अवॉर्ड पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आला आहे.**

सतत बदलणाऱ्या अचूक उद्योगात, जिथे गुणवत्ता आणि नावीन्यता सर्वोपरि आहे, डॉ. सुरेश तुळशीराम साळुंके हे कर्तृत्वाचे एक ज्वलंत उदाहरण म्हणून उभे आहेत. प्रतिष्ठित शैक्षणिक पार्श्वभूमी आणि स्थानिक आणि जागतिक स्तरावर भरपूर अनुभव मिळवून, त्यांनी अतुलनीय यश मिळवले आहे आणि भारताचा अचिव्हर्स अवॉर्ड २०२४ म्हणून ओळख मिळवली आहे.

त्यांची यशोगाथा केवळ त्यांच्या व्यावसायिक कामगिरीनेच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये त्यांच्या योगदानाद्वारे देखील परिभाषित केली जाते. रोजगाराच्या संधी निर्माण करणाऱ्या आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांनी उत्पादन क्षेत्रात टाटा इंडस्ट्रीजची भूमिका मजबूत केली आहे. त्यांचे व्यावसायिक आणि अध्यात्मिक समर्पण संपूर्ण व्यवसायाच्या लँडस्केपसाठी एक प्रेरणा म्हणून काम करते, जे आम्हाला दूरदर्शी नेतृत्वाच्या परिवर्तनीय शक्तीची आणि उत्कृष्टतेसाठी अटूट समर्पणाची आठवण करून देते.

आयआयएमच्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य म्हणून, इतर सल्लागार पदांद्वारे ते व्यवस्थापन शिक्षणाचे भविष्य घडवत राहतात, इच्छुक नेत्यांना त्यांचे ज्ञान आणि कौशल्य प्रदान करतात. त्यांचे जागतिक पेटंट आणि शोधनिबंध हे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन पद्धतींमध्ये प्रगती करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुरावा म्हणून उभे आहेत.

त्याची अष्टपैलुत्व आणि ज्ञानाची व्याप्ती या वस्तुस्थितीवरून दिसून येते की त्याचे कौशल्य उच्च श्रेणीतील इलेक्ट्रिकल उत्पादने, ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस, संरक्षण आणि FMCG यासह विविध उद्योगांमध्ये व्यापलेले आहे. सोसायटी ऑफ फेल्युअर ॲनालिसिस इंडियाचे संस्थापक सदस्य आणि संशोधन मंडळे आणि संरक्षण उद्योगाचे सल्लागार म्हणून त्यांनी विविध सल्लागार पदे स्वीकारल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाच्या कुशाग्रतेला सुरुवातीपासूनच मान्यता मिळाली. त्यांच्या धोरणात्मक अंतर्दृष्टी आणि परिवर्तनशील उपक्रमांमुळे त्यांना प्रतिष्ठित संस्थांचा विश्र्वास मिळाला, जिथे त्यांनी मानद संचालक आणि प्राध्यापक म्हणून काम केले आणि अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शिक्षणाच्या प्रगतीमध्ये योगदान दिले.

# दारू विक्रीविरोधात नागरिकांचा एल्गार



लातूर : लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या भांबरी, बसवंतपूर, वरवंटी परिसरातील अवैध हातभट्टी दारु विक्री करणाऱ्यांविरूद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी केली आहे.

लातूर शहरापासून जवळच असणाऱ्या भांबरी, बसवंतपूर, वरवंटी व परिसरात हातभट्टीच्या दारूसह अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात अवैध विक्री सुरू आहे. या परिसरात तब्बल ३० हातभट्टी दारू विक्रीची दुकाने आहेत. ही अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी, या मागणीसाठी प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली भांबरीपासून एमआयडीसी पोलीस ठाण्यापर्यंत शेकडो महिला - नागरीकांच्या उपस्थितीत भव्य मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा पीव्हीआर चौक-एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर आल्यानंतर ठिय्या आंदोलन करण्यात आले. पोलिसांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, भांबरी - बसवंतपूर व परिसरात हातभट्टी दारू व गांजा विक्रीची एकूण ३० दुकाने आहेत. या माध्यमातून दररोज सात लाखांची आर्थिक तर वार्षिक तब्बल २३ कोटी २० लाख रुपयांची आर्थिक उलाढाल होते. अवैध दारू - गांजा विक्रीमुळे व्यसनाधिनता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे गोरगरीबांचे संसार उध्वस्त झाले असून मागच्या दिड वर्षात या दारूच्या सेवनाने १०० लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही दारू व गांजा विक्री बंद करण्याच्या मागणीचे निवेदन आतापर्यंत अनेकवेळा एमआयडीसी पोलिसांना देण्यात आले आहे. मात्र त्यावर अद्याप पर्यंत कोणतीही

कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वात पाच किमी. अंतराचा हा लक्षवेधी भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात नागरीकांसह महिला, लहान मुलेही सहभागी झाले होते. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांनी मोर्चासमोर येऊन निवेदन स्वीकारण्यास नकार दिल्याने ठाण्यासमोर तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन करण्यात आले. या ठिय्या आंदोलनामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने पोलीस निरीक्षक नरवडे यांनी निवेदन स्विकारून अवैध दारू - गांजा विक्री करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांसह राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाबुराव क्षेत्रे पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर, प्रदेशाध्यक्ष पंडित तिडके, महिला प्रदेशाध्यक्षा ॲड. राणीताई स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष गिरे पाटील, किसन सारगे, जिल्हाध्यक्ष राजेश पवार, नेताजी जाधव, आदित्य कासले, तुषार रेड्डी, सुवर्णा नाईक, सुनील शिंदे, लक्ष्मण दणाने, त्रिशला गिरी, काशीबाई हांडे, जयश्री भूतेकर, योगीता ठाकूर, प्रिती कोळी, मोक्षदा भंडारकवठे, आकाश गडगळे, भारती सूर्यवंशी, अनिता बिराजदार, शितल तम्मलवार, निळकंठ बप्पा साळुंके, श्रावण रावणकुळे, ॲड. मनोज तिगाडे, गणेश पाटील, काशीनाथ शिंदेसह शेकडो नागरीक सहभागी झाले होते.

पान १ वरून

### महाराष्ट्र...

राज्यातील १९०० रूग्णालयात मिळतील मोफत उपचार

राज्यातील एक हजार ९०० रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेता येणार आहे. योजनेअंतर्गत रुग्णाला उपचार घेण्यासाठी संलग्रित रुग्णालयात जावे लागणार आहे. https://www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळावर योजनेतील रुग्णालयांची यादी उपलब्ध आहे. या वेबसाईटवर गेल्यानंतर तुम्हाला नेटवर्क हॉस्पिटलच्या पर्यायावर क्लिक करावे लागेल, त्यानंतर जिल्हा निवडल्यानंतर रुग्णालयांची संपूर्ण यादी दिसेल.

योजनेतील लाभार्थींची स्थिती

'पीएमजेएवाय'चे लाभार्थी
३,२६,८९,३२४

अंत्योदय, केशरी, पिवळे कार्डधारक
३,४२,७८,२४६

शुभ्र रेशनकार्डधारक
२,९२,४०,१७३

एकूण लाभार्थी
९,२६,०७,७४३

गोल्डनकार्ड जरूरी आहे

राज्य सरकारच्या नवीन निर्णयामुळे आता पांढरे रेशनकार्ड असलेल्यांनाही जनआरोग्य योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी लाभार्थींनी 'आयुष्यमान गोल्डन कार्ड' काढून घ्यावे आणि योजनेचा लाभ घ्यावा. जवळपास १३०० आजारांवर या योजनेतून मोफत उपचार मिळणार आहेत. - डॉ. माधव जोशी, जिल्हा समन्वयक, जनआरोग्य योजना, सोलापूर

### मान्सून पुढील...

दरम्यान, राज्यामध्ये काही भागात ढगाळ हवामानासह वादळी वा-यासह पाऊस पडत आहे. दुष्काळी भाग असलेल्या जिल्ह्यांमध्ये चांगला पाऊस झाला असून, इतर भागात काहीच झालेला नाही. मंगळवारी कोकण आणि पुणे, सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर जोरदार पाऊस होईल, असा अंदाज दिला आहे. तसेच मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वादळी वा-यासह पावसाचा इशारा दिला आहे. पुण्यासह राज्यात ढगाळ हवामान असून उन्हाचा चटका आणि उकाडा चांगलाच वाढलेला आहे. विदर्भामध्ये मात्र दमदार पावसाची प्रतिक्षा असून, मॉन्सून दाखल होऊन देखील पाऊस झालेला नाही. त्यामुळे पेरण्याही खोळंबल्या आहेत.

विदर्भात पुन्हा वाढले तापमान

विदर्भामध्ये पाऊस गायब झालेला आहे, तर दुसरीकडे तापमानाचा चटका सहन करावा लागत आहे. कमाल तापमान चाळीशीपार गेलेले आहे. सोमवारी (दि.१७) विदर्भातील चंद्रपूर (४०.४), ब्रह्मपुरी (४१.९), चंद्रपूर (४०.४), नागपूर (४०.४), वर्धा (४०.०) या जिल्ह्यांचे तापमान चाळीशीपार होते. तर यवतमाळ(३९.५), गोंदिया(३९.४), अकोला(३९.२) या जिल्ह्यांमध्येही चाळीशीच्या जवळ तापमान नोंदवले गेले. आज मंगळवारी कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गासह मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. तर विदर्भासह मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

### उज्ज्वल निकम...

करता येणार नाही, अशी भूमिकाही काँग्रेसने घेतली आहे.

राज्य सरकारने न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून पाप केले, उज्ज्वल निकम भाजपचे लोकसभेचे उमेदवार असताना त्यांना सरकारी वकील करून त्यांनी सिद्ध केलं की सरकारी वकीलही भाजपचे राहणार. पण भाजपच्या उमेदवाराला सरकारी वकील करता येणार नाही, ही भूमिका काँग्रेस पक्षाची असल्याचे नाना पटोल यांनी म्हटले आहे.

भाजपच्या उमेदवाराला सरकार वकील करता येणार नाही राज्य सरकारने न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून पाप केले, उज्ज्वल निकम भाजपचे लोकसभेचे उमेदवार असताना त्यांना सरकारी वकील करून त्यांनी सिद्ध केले की सरकारी वकीलही भाजपचे राहणार. पण भाजपच्या उमेदवाराला सरकारी वकील करता येणार नाही, ही भूमिका काँग्रेस पक्षाची आहे असे नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

### वर्षा गायकवाड...

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे दिला आहे.

राष्ट्रवादीच्या निलेश लंके यांनी शरद पवार गटातून उमेदवारी मिळताच राजीनामा दिला होता. परंतू, ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेल्या रिंवद्र वायकरांनी आमदारकीचा राजीनामा दिला नव्हता. तसेच संभाजीनगरहून खासदार झालेले संदिपान भुमरे देखील खासदारकीचा राजीनामा देणार आहेत. वर्ध्याच्या काँग्रेसच्या नवनियुक्त खासदार प्रतिभा धानोरकरही आमदारकीचा राजीनामा देणार आहेत.

### विद्यार्थ्यांनी...

काळगे यांचा राजाभाऊ ( दादा ) हालकुडे, उमाकांत कोरे यांनी जीवनगौरव पुरस्कार देऊन सत्कार केला. शंभूलिंग शिवाचार्यांचे स्वागत लक्ष्मीकांत मंठाळे, तम्मा चौंडा यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महेश कोळ्ळे यांनी केले. या प्रसंगी विश्र्वनाथ निगुडगे, डॉ. सतीश बिराजदार, बंडप्पा जवळे, ॲड. मधुकर राजमाने, डॉ. मन्मथ भातांब्रे, बाबुराव वाघमारे गुरुजी, राजकुमार कत्ते, राजेश विभूते, रामदास भोसले, भानुदास डोके यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश कनडे, गौरीशंकर संकाये, सिद्रामप्पा पोपडे, बाबुराव सोलापूरे, बाबुराव राचट्टे, पंकज कोरे, सुहास आष्टके आदींनी परिश्रम घेतले.

### जिल्हाधिकारी...

बाजारपेठ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच शेतकऱ्यांना मिलेटचे चांगल्या प्रतीचे बियाणे लोदगा येथील फिनिक्स फौंडेशनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. मिलेट पिकांसाठी कमी पाणी लागते, तसेच ८० ते ९० दिवसांत ही पिके घेतली जातात. लातूर जिल्ह्यातील पर्जन्यमानाचा विचार करता जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मिलेट लागवड फायदेशीर ठरणार असल्याचे कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले.

मिलेटचा आहारातील समावेश ही काळाची गरज असून मिलेट हे आरोग्यासाठी हितकारक असल्याचे सिद्ध झाले आहे. ज्वारी, बाजरी, भगर, राजगिरा, राळे आदी मिलेटची पेरणी जिल्ह्यात जास्तीत जास्त क्षेत्रावर होण्यासाठी कृषि विभागाने प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच मिलेटपासून तयार करण्यात आलेले पदार्थ आरोग्यदायी असल्याने बचतगटांच्या माध्यमातून अशा पदार्थांची विक्री वाढविण्यासाठी जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ आणि कृषि विभागामार्फत प्रयत्न करण्याबाबत सूचना देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

पोषणाच्या दृष्टीने मिलेट आहे फायदेशीर

मिलेट पोषणाच्या दृष्टिकोनातून भातापेक्षा अधिक फायदेशीर आहे. त्यामध्ये अधिक कॅलोरी, प्रथिने, चरबी, कार्बोहायड्रेट, फायबर, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस आणि थायमिन (बी१) असतात. त्यामुळे, मिलेटचा समावेश आहारात केल्यास अनेक पोषणतत्त्वे अधिक प्रमाणात मिळू शकतात, ज्यामुळे एकंदरीत आरोग्य चांगले राहण्यास मदत होऊ शकते.

मिलेटचे असे आहे पोषणमूल्य

ज्वारी : रक्तातील सारखेची पातळी नियंत्रित करते. रक्ताभिसरण वाढवते. ज्वारी वजन कमी करण्यास मदत करते. हाडांच्या आरोग्यासाठी ज्वारी उपयुक्त ठरते. शरीरातील ऊर्जा पातळी सुधारते. तसेच हृदयाचे आरोग्यही ज्वारीमुळे सुधारते.

बाजरी : बाजरीमध्ये कॅल्शियम, विटामिन ए, बी व फॉस्फरस, लोह, मँगेनीज अधिक मात्रेत उपलब्ध असते. रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित, रक्तदाबावर नियंत्रण, हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी व नेमिया आजारावर मात करण्यासाठी बाजरी उपयुक्त आहे.

नाचणी : शक्तीवर्धक, पित्तशामक असल्याने नाचणी रक्त शुद्ध करण्यास उपयुक्त आहे. कॅल्शियम आणि लोह मुबलक असल्याने गरोदर माता व वयोवृद्ध व्यक्तींना हाडांसाठी व निमियावर नाचणीचे पदार्थ उपयोगी ठरतात. नाचणीमुळे लठ्ठपणा कमी करणे, मधुमेही रुग्णांसाठी गुणकारी, यकृतातील चरबी कमी करण्यास मदत होते. राळा : यामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढवते. त्यातील अँटीऑक्सिडन्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. तसेच अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर होतो.

वरई : नवजात शिशु, बालक आणि माता यांच्यासाठी उत्तम पोषकधान्य आहे. सदृढ आरोग्य व रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यास वरई उपयुक्त आहे. वरई मधुमेह, हृदयरोग यासारख्या रोगांचा धोका कमी करते.

# चाकरवाडी म्हणजे या युगातील भू वैकुंठच : शिवाजी महाराज

**श्याम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी– बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी म्हणजे या युगातील एक भूवैकुंठच आहे इथे नामघोष आहे टाळ आहे अखंड नामस्मरण आहे नुकतीचा प्रसाद आहे आणि जीवाला मुक्ती आहे हे सामर्थ्य माऊलींच्या तपाने प्राप्त झालेले आहे असे उद्गार ह भ प श्री शिवाजी महाराज नारायण गड यांनी काढले.

काल सोमवार दिनांक १७ जून रोजी माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यस्मरण सोहळ्यात कीर्तन सेवेत ते बोलत होते सेवेसाठी. संता पायी माथा ठेविता सदभावे तेणे भेटे देव आपेआप म्हणवोनी संता अखंड भजावे तेने भेटे देव आपेआप साधू पाशी देव काम धंदा करी पितांबर घरी वरी छाया नामा म्हणे देव इच्छी संत संग आम्हा जिवलग जन्मोजन्मी या अभंगावर अत्यंत भक्ती प्रचूर चिंतन मांडताना ह भ प शिवाजी महाराज म्हणाले केवळ साधुसंत तपस्वी सत्पुरुष यांच्या पावन पवित्र चरणावर आपले मस्तक जर ठेवले तरी त्यांची कृपा होते व या कृपेने आपणास देव भेट घडते संतांच्या शिकवण तत्त्वाची ताकद माणसाला माणूस तर बनवतेच पण सोबत देवत्व बहाल करते ती शक्ती ती चैतन्य ती ऊर्जा ती किमया ती परमार्थिक अधिकार माऊलींच्या मध्ये होता असे महाराज म्हणाले आपण संतांची म्हणजे इथे चाकरवाडीत माऊलींची शिकवण उपदेश संदेश त्यांनी सांगितलेला नित्यनेम आचरणात आणण्यासाठी येतो त्याचे नित्य सेवा स्मरण केल्यास जो जे वांछील तो ते लाहो हे माऊलींचे वचन सार्थ ठरते असा विश्र्वास महाराजांनी व्यक्त केला.

# यशवंत धाराशिव जिल्हा

बुधवार दि. १९ जून २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## सिरसाव येथील बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षण



परंडा दि.१८ (प्रतिनिधी) – उमेद बचत गटातील महिलांना दुग्ध व्यवसाय प्रशिक्षणासाठी संपदा ट्रस्ट इंडसइंड बँक अंतर्गत ४ दिवशीय मोफत प्रशिक्षण तर डॉ पंजाबराव देशमुख कृषी संजीवणी पंधरवाडा दिवस निमित्त शेंद्रीय शेती व फळबाग लागवड विषयी तालुक्यातील सिरसाव येथील शेतकरी महिलांना दि.१८ जून रोजी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी एन एन लांडगे, सरपंच कुमार वायकुळे, लघुउद्योग सल्लागार गणेश नेटके, प्रेरिका सिमा नवले, कृषि सखी वर्षा मिसाळ, पशु सखी जयश्री चोबे, कृषी सहायक राहुल जाधव, प्रभाग समन्वयक विजय गवळी, प्रकल्प अधिकारी सुजित जगताप, मार्गदर्शक जिल्हा समन्वयक विकास गोफणे व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# भाजप यापुढे देश, देव व धर्म रक्षणासाठी सक्षमपणे काम करणार - चौधरी

## जिल्ह्यातील विकासाचे प्रलंबित प्रश्न मुख्यमंत्र्याकडे मांडून सोडविण्यासाठी प्रयत्न



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – भारतीय जनता पार्टी ही जगातील बलाढ्य पार्टी असून नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदी विराजमान झाले आहेत. त्यांनी प्रधानमंत्रीपदाची सूत्रे स्विकारताच पहिली सही घरकुल व शेतकरी सन्मान निधीच्या फाईलवर करून जनसेवा सुरू केली आहे. प्रधानमंत्रीपदाची सूत्रे स्विकारल्याबद्दल मोदी व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करणारा ठराव बैठकीत पारित करण्यात आला. विशेष म्हणजे या निवडणुकीमध्ये अर्चनाताई पाटील यांचा पराभव का झाला ? यावर विचार मंथन करून त्याची कारणे शोधली जात असून मतदार संघातील विकास कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. सिंचन, रस्ते व इतर प्रलंबित प्रश्न असून देशात व महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे त्या प्रलंबित विकास कामांची मांडणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे करून ते प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा लोकसभा निरीक्षक विजय चौधरी यांनी दि.१८ जून रोजी दिले.

धाराशिव लोकसभा मतदार संघात झालेल्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या पराभवाची कारणमीमांसा करण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड व्यंकटराव गुंड, ॲड अनिल काळे, ॲड.खंडेराव चौरे, डॉ.गोविंद कोकाटे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, ॲड.नितीन भोसले, इंद्रजित देवकते, प्रवीण पाठक, विकास कुलकर्णी, प्रदीप शिंदे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना चौधरी म्हणाले की, आगामी काळात प्रधानमंत्री आवास योजना अधिक गतिमान करणे, जागतिक योगदिन सर्वत्र साजरा करणे, वृक्षारोपण, श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, प्रधानमंत्री मोदींचा मन की बात हा कार्यक्रम सर्व स्तरावर दाखवणे, बोगस मतदान टाळण्यासाठी मतदार यादीमधील दुरुस्ती (करेक्शन) व नवीन युवा मतदाराला मतदान करता यावे यासाठी (ॲडिशन) नोंदणीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे, मतदान केंद्राचे अंतर कमी करण्यासह मतदान केंद्रांची संख्या वाढविण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे २०14 साली जगात देशाची आर्थिक स्थिती १० व्या क्रमाकार होती. ते लवकरच ५ व्या स्थानावर येऊन देशाला महासत्ता करण्याचे स्वप्न पूर्णत्त्वास जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गेल्या १० वर्षात मोदींच्या नेतृत्त्वाखालील सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून यामध्ये ३७० कलम हटविणे, प्रभु श्रीराम मंदिराचे बांधकाम, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकर्यांच्या खात्यावर निधी जमा करणे, ११ कोटी गरीब कुटुंबांना उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडणी, ६० कोटी जनतेला आयुष्मान भारत योजनेंतर्गत वेगवेगळ्या आजारांवर ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आदींसह इतर कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. त्यामुळेच जनतेने मोदी यांना सत्ता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात काही ठिकाणी फटका

लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान विरोधी पक्षाकडून अपप्रचार करण्यात आला. भाजपा सरकार निवडून आल्यास भारतीय संविधान बदलण्यात येईल, आरक्षण काढून घेण्यात येईल असा चुकीचा समज पसरविण्यात आला. तसेच मराठा आरक्षण आंदोलनाचा काही ठिकाणी फटका बसला असल्याचे यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस तथा लोकसभा निरीक्षक श्री.चौधरी यांनी स्पष्ट केले.

### जातीय तेढ महाराष्ट्राला शोभणारी नाही

महाराष्ट्र राज्यात सध्या जातीय तेढ निर्माण करण्याचे काम काहीजण करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षि शाहु महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संत-महंतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राला ही बाब शोभणारी नाही. देश आणि धर्मासाठी लढणार्या या राज्यातील जनतेने यावरुन बोध घेण्याची गरज श्री.चौधरी यांनी व्यक्त केली.

### नाना पटोलेंचा निषेध

काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी एका कार्यकर्त्याकडून स्वतः चे पाय धुवून घेतल्याचे वृत्त अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. एकीकडे देशाचे प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदीजी अथवा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्यासमोर एखादी महिला आल्यास तिच्या पाया पडून दर्शन घेतात. मात्र काँग्रेसचे नेते मात्र कार्यकर्त्याकडून पाय धुवून घेतात, ही लाजिरवाणी बाब असून काँग्रेसला सत्तेचा माज चढल्याचे यावरुन दिसत आहे. पुढे कदाचित यांची सत्ता आल्यानंतर ते जनतेकडूनही पाय धुवून घेतील. म्हणून आपण या घटनेचा निषेध करत असल्याचे श्री.चौधरी यांनी सांगितले.

धाराशिव लोकसभा मतदार संघातील सिंचन, रस्ते, आरोग्य व इतर प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना कार्यकर्त्यांनी आढावा बैठकीत दिलेल्या आहेत. देशात व महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असल्यामुळे त्याबाबतही तात्काळ कार्यवाही करुन हे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे श्री.चौधरी यांनी सांगितले.

## तेली समाज संघटनेच्यावतीने तेली महासंघाचे प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी यांचा सत्कार



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र प्रदेश विजय चौधरी यांचा तेली समाज संघटनेच्यावतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन दि.१८ जून रोजी सत्कार करण्यात आला. चौधरी हे संघटनात्मक दौऱ्यासाठी धाराशिव येथे आले होते. यावेळी त्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना शासकीय विश्रामगृहात मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष रवी कोरे, जिल्हा सचिव ॲड विशाल साखरे, कोषाध्यक्ष महादेव मेंगले, युवक महासंघाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत बेगमपुरे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख कपिल नवगिरे, जिल्हा संचालक मंगेश जवादे, कळंब तालुकाध्यक्ष सचिन देशमाने, कळंब शहराध्यक्ष अशोक चिंचकर, युवराज नळे, समता परिषदेचे सरचिटणीस आबासाहेब खोत, चंद्रशेखर राऊत, प्रविण घोडके, जितेंद्र घोडके, मुन्ना सुरवसे, बालाजी भोकरे, पप्पु माळी, दिपक नाईक यांच्यासह पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजाभवानी मंदिरातील मौल्यवान अलंकाराची जबाबदारी अधिकृत करावी

### गंगणे व ॲड. कुलकर्णी यांची मागणी

तुळजापुर दि.१७ (प्रतिनिधी) – श्री तुळजाभवानी देवीचे ऐतिहासिक, पुरातन व अतिमौल्यवान दागदागिणे, मौल्यवान सर्व धातूंच्या वस्तूंची पूर्वीप्रमाणे आलेल्या रूढीनुसार लिखीत आदेश देऊन जबाबदारी अधिकृत करावी, अशी मागणी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे व ॲड. शिरीष कुलकर्णी यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यामध्ये श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान हे १९६२ साली नोंदणी झालेले न्यास आहे. त्याचा न्यास नोदणी क्रमांक ए-१०२४ असा असून धाराशिव तथा अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी आहेत व इतर ४ जण श्री तुळजाभवानी न्यासाचे विश्वस्त म्हणून गेली अनेक वर्ष काम पाहत आहेत तर २ विश्वस्त हे लोकप्रतिनिधी आहेत. श्री तुळजाभवानी न्यासाच्या सर्वच चल व अचल संपत्तीचे विश्वस्त म्हणून मोठी जबाबदारी या सर्वांवर आहे. या संपत्तीचे विश्वस्थ म्हणून रक्षण करणे हे काम व कर्तव्य आहे. तसेच श्री तुळजाभवानी ट्रस्टचे (न्यासाची) चल व अचल संपत्तीचे रखवालदार हे धर्मादाय आयुक्त आहेत, त्यांचीही जबाबदारी कायदयानुसार अधोरेखीत आहे. तर श्री तुळजाभवानी मंदिर ट्रस्टची सर्व चल व अचल संपती ही श्री तुळजाभवानी ट्रस्टची आहे. ती भक्तांकडून दान म्हणून आलेली असून त्याचे संगोपन व काळजी, निगराणी करणे विश्वस्तांचे काम व कर्तव्य आहे. त्यावर नियंत्रण निगराणी ठेवणे धर्मादाय आयुक्तांचे काम असल्यामुळेच श्री तुळजाभवानी देवीचे पुरातन व ऐतिहासिक व अतिमौल्यवान दागिणे याचे मोल होऊ शकत नाही. त्याची अफरातफर व चोऱ्या होणे यामध्ये न्यासाचे फार मोठे आर्थिक नुकसान व बदनामी आहे. या संपत्तीची काळजी घ्यावयाची असेल तर पूर्वीप्रमाणेच सर्वच संबंधित लोकांकडून पूर्वीप्रमाणेच जामिन घेण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## पत्रकारांच्या १० वी व १२ वी गुणवंत पाल्यांचा उद्या गुणगौरव सोहळा

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – धाराशिव तालुक्यातील पत्रकारांच्या १० व १२ वी नीट व जेईई उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार व्हाईस ऑफ मीडिया धाराशिव तालुक्याच्यावतीने २० जून रोजी करण्यात येणार आहे.

पत्रकार हा समाजाच्या सर्व घटकातील विद्यार्थ्यांचे आपल्या लेखणीतून कौतुक करतात. मात्र पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा ते सत्कार करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे हा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला असून हा कार्यक्रम धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात गुरुवार दि.२० जून रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान धाराशिव तहसीलच्या तहसिलदार डॉ. मृणाल जाधव या भूषविणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून धनश्री शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रतापसिंह पाटील, धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड, जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी दत्ता लांडगे व प्रा रवी सुरवसे हे उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने हा पत्रकारांच्या पाल्यांना प्रोत्साहन देणारा कार्यक्रम प्रथमच आयोजित केला असल्यामुळे जास्तीत जास्त पत्रकारांनी आपल्या पाल्यांसह सहकुटुंब उपस्थित रहावे, असे आवाहन व्हॉईस मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## जरांगे यांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी आम्ही जरांगे - गरजवंत मराठ्यांचा लढा चित्रपट पहावा - डॉ. मोरे



धाराशिव दि. १८ (प्रतिनिधी) – मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या लढ्यावर आधारित आम्ही जरांगे-गरजवंत मराठ्यांचा लढा या चित्रपटातून जरांगे यांचे विचार घराघरात पोहोचविण्या येणार आहेत. हा चित्रपट दि.२१ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जरांगे यांच्याबरोबरच मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेले माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील, छावा संघटनेचे संस्थापक अण्णासाहेब जावळे यांनी आरक्षणासाठी आयुष्यभर केलेला संघर्ष तसेच मराठा समाजाचा आक्रोश या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून तळागाळातील प्रेक्षकांना आरक्षणाचा १९६० पासून सुरू झालेला आरक्षणाचा इतिहास महाराष्ट्रासह कर्नाटक व आंध्र प्रदेशातील मराठी भागामध्ये प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे सर्व घटकातील महिला व पुरुषांनी हा चित्रपट आवर्जून पाहण्यासाठी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना सिनेमागृहामध्ये आणावे, असे आवाहन या चित्रपटाचे निर्माते डॉ. दत्ता मोरे यांनी दि.१८ जून रोजी केले.

धाराशिव शहरातील हॉटेल पुष्पक पार्क येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मनोज जरांगे पाटील यांची तरुणपणीची भूमिका साकारलेले अभिनेते पृथ्वीराज थोरात, मराठा आंदोलक श्याम पाटील वडजे (नांदेड), अक्षय नाईकवाडी, संदीप अंधारे, अभिजित सुर्यवंशी, प्रशांत सुर्यवंशी, संदीप पवार व घनश्याम रितापुरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ मोरे म्हणाले की, मराठा आरक्षणाची चळवळ उभारणारे मराठा समाजाचे नेते अण्णासाहेब पाटील व अण्णासाहेब जावळे पाटील यांच्यानंतर मनोज जरांगे यांनी आरक्षणाचा लढा अधिक तीव्र केला असल्याचे त्यांनी सांगितले. तर संपूर्ण मराठा समाज आज जरांगे यांच्या पाठीशी उभा असल्यामुळे हा लढा अधिक गतिमान झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे मराठा आरक्षणाच्या १९६० पासूनचा धगधगता इतिहास या चित्रपटाच्या माध्यमातून मांडला असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे चित्रपटात मनोज जरांगे यांची भूमिका अभिनेते मकरंद देशपांडे यांनी तर अण्णासाहेब जावळे पाटील यांची भूमिका अभिनेता प्रसाद ओक व माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांची भूमिका अजय पुरकर यांनी प्रभावीपणे साकारली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच यांच्या समवेत अभिनेते सुबोध भावे, विजय निकम, कमलेश सावंत, भूषण पाटील, चिन्मय संत, प्रेम नरसाळे, अमृता धोंगडे, अंजली जोगळेकर व आरती त्रिमुखे यांनीही भूमिका साकारल्या असल्याचे त्यांनी सांगितले. तर संगीत पी. शंकरन यांनी दिले असून या चित्रपटातील गाण्याला भारदस्त आवाज सोनू निगम, अजय गोगावले व आदर्श शिंदे यांनी दिला असल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही जरांगे - गरजवंत मराठ्यांचा लढा या चित्रपटाची कथा-पटकथा सुरेश पंडित यांनी तर संवाद सुरेश पंडित, संजय नवगिरे व किशोर गरड यांनी लिहिले आहेत. तसेच दिग्दर्शन योगेश भोसले यांनी केले असून सहनिर्माते उत्तम मगर, डॉ.मधुसुदन मगर, विक्रम पाटील, दमयंती पाटील, डॉ.दत्ता मोरे व स्वतः दिग्दर्शक योगेश भोसले हे असल्याचे त्यांनी नमूद केले. तर छायाचित्रण विकास सिंह यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## प्रा. कदम यांच्या हस्ते धाराशिव नाट्य महोत्सवाचे उद्घाटन





धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसरातील नाट्यशास्त्र व लोककला विभागाच्यावतीने चौथ्या धाराशिव नाट्य महोत्सवाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. अंकुश कदम यांच्या हस्ते दि.१६ जून रोजी थाटात उद्घाटन करण्यात आले.

धाराशिव येथील विद्यापीठात गेल्या चार वर्षापासून नाट्यशास्त्र व लोककला विभाग धाराशिव शहरामध्ये नाट्य महोत्सवाचे आयोजन करत आहे. दिवसेंदिवस या नाट्य महोत्सवाला रसिकांची दाद मिळताना दिसते आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून अधिसभा सदस्य ज्येष्ठ पत्रकार देविदास पाठक हे तर अध्यक्षस्थानी उपपरिसर धाराशिवचे प्रभारी संचालक डॉ.प्रशांत दीक्षित यांनी उपस्थित होते. उपस्थितांनी नाट्य महोत्सवाचे कौतुक केले. तसेच नाट्यशास्त्र व लोककला विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी विभाग प्रमुख डॉ.महेश्वर कळलावे यांनी तर सूत्रसंचालन विद्यार्थी पृथ्वी चव्हाण यांनी व उपस्थितांचे आभार डॉ. गणेश शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी व नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# घराचं घरपण बाबा

झिरो ते हिरोपर्यंतच्या साऱ्या भूमिका यथावकाशपणे साकारणारा घरातील नटसम्राट म्हणजे बा, ज्याच्या साधेपणानं घराला ऐश्वर्य लाभतं. वाघाचं काळीज असलेल्या बापाचं मोल अनमोल असं आहे; ते ज्याला कळतं त्याचा पुढील मार्ग सुखकर होतो. बाप नावाचं बाळकडू ज्याला लाभतं, तो या जगातील सर्वात सुखी माणूस म्हणता येईल. काचेचं दोलक उन्हात धरलं असता, डोळ्यांस जसे सप्तरंग दिसतात, त्या सारखाचं वरवर रंगरंगोटीचे मुखवटे जडवलेला बाप अंतःकरणात मायेशी नाळ जोडणारा शासक असतो. त्याचं वरवरचं दिसणं म्हणजे आपण म्हणू काट्यातल्या फणसासारखं जरी असलं तरी आतला मऊशार गर ही त्याची खासियत सर्वस्वी उदारमतवादी विचारांची पुस्ती जोडणारी आहे. शांत डोहातल्या नितळ पाण्याची उपमा बाबाला देऊ केली तरी, त्यात उठणाऱ्या तरंगाची लय पाहिली आहे का, कोणी जवळपास कोणालाही दिसत नाही ती. अन्यथा तिला समजून घ्यायला आपण तोकडे पडत आहोत. सहजा-सहजी बाप कळलाय का कुणाला? याचं उत्तर अजिबात नाही असंच देता येईल. अखेरच्या क्षणापर्यंत कळत नाही तो बाप. त्याच्या खंबीर खांद्याआड सुरक्षित असलेले आपण अनभिज्ञ राहातो. त्याचे उदात्त भाव कळायला बरीच वर्षे वाया घालवतो.

उत्तम रचनाकार आपल्या रचनेत बाबा या शब्दाशी येऊन थांबतात. कसं लिहावं हा प्रश्न नसतो; परंतु बाबा या एका शब्दाला कवेत घेण्याइतपतची प्रतिभा सापडत नसावी. त्याची महती सांगणारी उपमा, विशेषण, यमक यांची वानवा भासावी इतकं हे गहन वलय असतं. तेव्हा काय लिहावं या मर्यादा नित्य लेखणीला भिडत असाव्यात. मराठी साहित्यात आई विषयीच्या रचना सातत्याने पाहायला मिळतात. शब्दात पकडलं जावं इतकं बाबा शब्दाचं माहात्म्य छोटं नाही. ते जाणवण्या इतकी खोल विचार उडी आपली नसावी कदाचित. कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला यात बाबा विषयीचे पारिवारिक कर्तव्य स्पष्ट होतं. जगत नाही तो कधी स्वतःसाठी. समर्पण, कष्ट आणि त्याग यांच्या आहुतीत स्व जीवनाचा कदापि स्पर्श होत नसावा त्याला. म्हणून साधेपणाच्या तेजस्वी दीपज्योतीनी उजळून निघतो तो. आनंदाच्या बळकटीसाठी विवेकाची कास धरणारा, कुटुंबवत्सल असा बाप नावाचा माणूस दुसऱ्यांसाठी सुखद पायवाट निर्माण करतो तो आपल्या सच्चेपणाने. चढ-उताराची साखळी पार करताना आयुष्यात जेरीस आणणारे प्रसंग कोरतो तो स्वतःच्या छाताडावर. व्रणाची पर्वा न करता इमान राखतो कर्तव्याशी. कर्त्या पुरुषाला रडणं शोभत नाही, म्हणून रात्रीच्या गर्द काळोखात अश्रू टिपत बसलेला बाप दिसत नाही कुणाला. दैवगतीनं एक व्रत सतत त्याच्याही आयुष्याला जोडलेलं असतं. तरीही अधिकाराने नेहमीच्या जगण्याचे नियम धाब्यावर बसवत नाही तो कधी. बाबा समजायला मला स्वतःला खूप काळ लोटला आहे. मला कळलेला बाबा कागदावर उतरवताना कागद भरून येतो, पण त्याच्या विषयीच्या भावना संपता संपत नाहीत. या अशा स्थित्वाचा मौलिक धडा, समजावत बाबा गेला. लेकी जग आहे बेरकी, मोठं होता कळेल तुला । आज तूच नाहीस गड्या, बीजनवांकुर बघाया. काळीज भेदले असते, या डोळ्यांनी जग दावाया । मी लिहीत जाते, तरी बाप संपत नाही. त्याच्या अतिसूक्ष्मतम अस्तित्वाचं वरदान मागे असल्याचं जाणवत राहातं मला सदोदित.बाबा तुला कळतं का रे मनातलं, कधीतरी बोल अन् खोल गुपित स्वतःतलं. तुझा चेहरा पाहून काळीज तुटत रे आतलं, कधीतरी बोल अन् खोल गुपित स्वतःतलं.तो उठतो, पडतो, धडपडतो, तरीही लढतो स्वकर्तृत्वावर. दशा घेऊन दिशा देतो आपणास. धर्म पाळून कर्माची गोड फळं टाकतो आपल्या पदरात आपल्यापेक्षा चार बुक कमी शिकला म्हणून बाप नसतो अडाणी, आपलं बोट पकडून अनुभवाची शिदोरी देतो आपल्याला आणि मोकळं करतो स्वत:ला. पण अंति उरत नाहीत त्याच्या कुठल्याही इच्छा. कायम सोबत करतात त्याच्या सदिच्छा. देवा तुझ्या गाभाऱ्यात, निरंजन तेवत आहे. आयुष्याचं इंद्रधनू माझा बाबा पेलतो आहे. चेहऱ्यावरच्या रेषा ढळू दिल्या नाही कधी, हृदयातला मर्म भाव कळू दिला नाही कधी. मोडला नाही कणा त्याचा अजूनही लढतो आहे, आयुष्याचं इंद्रधनू माझा बाबा पेलतो आहे. शिस्तीचे धडे तुझ्याकडून गिरवले, जगण्याच्या परीक्षेत पास होऊन दाखवले. डोक्यावर ठेवून एक हात अनेक वर्षे उभा आहे. आयुष्याचं इंद्रधनू माझा बाबा पेलतो आहे. मंडळी बाप होणं सोपयं, पण बा कळणं कठीण आहे. सुखी सदऱ्याचं दुसरं नाव बा असावं. कुठलाही व्रण, डाग त्याच्या सदऱ्यावर नसलेला. पांढऱ्या शुभ्र सतेज कापडात शोभणारं बा नावाचं वादळ सदैव आपली सोबत करेल; परंतु आपल्या विचारांमधली त्याच्या विचारांची गरज वेळ, काळ आल्यावर ज्याची त्याला कळली की झालं! पण त्याकरिता त्याच्यासारखं होणं जमायला हवं. त्याच्यासारखं जगायला हवं. आपण घडलो. आता पुढची पिढीच सांगेल. ती घडतेय की बिघडतेय ते. यातून काहीही चांगलं झालंच तर त्या बापाचा जन्म सार्थकी लागेल एवढं मात्र खरं.

**कृतज्ञतेची भावना**–सुनोरा हिने फादर्स डेच्या सेलिब्रेशनला सुरुवात केल्यानंतर अन्य मंडळीही या प्रकारे सेलिब्रेशन करू लागले. १९१६ मध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुडरो विल्सन यानी फादर्स डे' साजरा करण्यासाठी अधिकृत मान्यता दिली. १९६६ मध्ये राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉनसन यांनी जूनच्या तिसऱ्या रविवारी फादर्स डे साजरा करावा, अशी घोषणा केली. तेव्हापासून जगभरात जूनच्या तिसऱ्या रविवारी फादर्स डे साजरा केला जातो.आपल्या मुलाला घडवण्यामध्ये वडिलांचा मोठा वाटा असतो. पण आपण कधी त्यांना थँक्यू म्हणत नाही. आपल्या बाप माणसाबद्दल मनातील भावना व्यक्त करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली, तर नक्कीच त्याच्या चेहऱ्यावर तुम्हाला एक वेगळे समाधान दिसून येईल. आई-वडिलांच्या उपकारांची परतफेड कधीच करता येत नाही. पण तुम्ही त्याच्या कष्टाचं चीज झालंय हे दाखवण्यासाठी त्यांच्यावरील प्रेमाची भावना दाखवून दिली, तर त्यांना भरून पावल्यासारखं होईल. तुम्ही या दिवशी वडिलांसोबत खास बेत आखू शकता. आपली आवड जोपासणाऱ्या बाप माणसाला काय आवडते ते समजून घेऊन तुम्ही वडिलांना काहीतरी सरप्राईज गिफ्ट देऊ शकता. थोडक्यात तुमच्या मनातील त्यांच्याबद्दलची प्रेमाची भावना दाखवून देता येईल, कोणतीही गोष्ट तुम्ही यादिवशी करू शकता.बाप हा फणसासारखा बाहेरून काटेरी आणि आतून गोड असतो, असे म्हणतात. ही गोष्ट लक्षात घेऊन प्रत्येकाने आपल्या वडिलांसोबतचे नाते घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. प्रत्येक वर्षी फादर्स डेच्या दिवशी तुम्ही या दिवसाचे मेगा सेलिब्रेशन कराच. पण तुमच्या आयुष्याचा प्रत्येक दिवस त्याचा आहे. त्यामुळे चुकूनही त्याला विसरू नका.


# बुडत्याचा पाय खोलात

देशामध्ये निवडणुकांची धामधूम सुरू असताना पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा चर्चेत आला. पाकिस्तानी न्यायालयाने पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा नव्हे, तर विदेशी भाग आहे, असे वक्तव्य केले. विश्लेषक आणि राजकीय पक्षांनी याला पाकिस्तानचे राजकीय अपयश म्हटले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर तोंडावर पडणाऱ्या पाकिस्तानने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून भारताच्या दाव्याला बळकटी दिली आहे.

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी अलीकडेच केलेल्या भाषणात अटलबिहारी वाजपेयी सरकारबरोबर झालेल्या लाहोर कराराचा भंग करून पाकिस्तानने मोठी चूक केली', असा कबुलीजबाब दिला होता. कारगीलचे युद्ध त्यातूनच झाले. शरीफ यांच्या कबुलीजबाबाला काही अवधी उलटत नाही, तोच पाकिस्तानने आणखी एक कबुलीजबाब दिला. त्या अंतर्गत इस्लामाबाद उच्च न्यायालयात पाकव्याप्त काश्मीर हा विदेशी भाग असल्याचे सरकारी वकिलांनी सांगितले. अर्थातच यावरून अनेकांना आश्चर्य वाटले असेल. पाकिस्तानने प्रथमच अशी कबुली दिल्याचा भास अनेकांना होत आहे. भारतामध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात काही राजकीय पक्षांनी पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेण्याची भाषा वापरली.

पाकिस्तानच्या वकिलांच्या या दाव्यानंतर भारताने पाकव्याप्त काश्मीरचा लगेच ताबा घ्यावा, असे काहींनी सरधोपटपणे म्हटले असले तरी केंद्रीय सरंक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी यापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत भारत कोणावरही आक्रमण करणार नाही, असे म्हटले आहे. कोणाला भारतात सामील व्हायचे असेल तर तसा निर्णय घ्यावा, असेही त्यांनी म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्यातून पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेणे एवढे सोपे नसल्याची सजाण दिसून येते. शिवाय पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नाही, हे न्यायालयात पाकिस्तानने सांगितले असले, तरी हा भाग नेमका कुणाचा आहे, हे सांगितलेले नाही. शिवाय गेल्या वर्षीच पाकव्याप्त काश्मीरच्या कैद्यांबाबत पाकिस्तानने ते आपले नसल्याचा दावा केला होता. म्हणजेच अडचणीचे प्रसंग येतात तेव्हा पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरची जबाबदारी टाळतो, हे काही नवीन नाही.

नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन होईल, त्यासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, असे साकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घातले होते. हा प्रचाराचा भाग होता. त्यांनी जाहीर केल्यानुसार खरेच सहा महिन्यांमध्ये पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन होईल का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. याचे कारण आधी आपल्याला पाकव्याप्त काश्मीरमधील संघर्ष, तिथली परिस्थिती समजून घ्यावी लागेल. अर्थात असे असले, तरी पाकिस्तानच्या न्यायालयात सरकारी वकिलांनी घेतलेल्या भूमिकेवर सरकारने शिक्कामोर्तब केले असे म्हणता येणार नाही. शिवाय पाकिस्तानी नेत्यांच्या यापूर्वीच्या उक्ती आणि कृतीमध्ये वारंवार फरक दिसल्याने आपल्याला जितं मया' करून चालणार नाही. असे असले, तरी पाकिस्तानने या



घटनेतून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून पाकव्याप्त काश्मीर हा बळकावलेला भाग आपलाच असल्याच्या भारताच्या दाव्याला बळकटी दिली आहे.

दुसरी बाब म्हणजे पाकव्याप्त काश्मीर हा स्वतंत्र देश असल्याचे पाकिस्तानने म्हटलेले नाही. उलट त्यांनी पाकव्याप्त काश्मीर हा विदेशी प्रदेश' असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ असाही होतो की काश्मीर हा स्वतंत्र नसून इतर देशाचा भाग आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि आपण बळजबरीने एक भाग बळकावला आहे, असे अप्रत्यक्षपणे का होईना, पाकिस्तानला वाटते असे जाणवते. उच्च न्यायालयात सरकारच्या या वक्तव्यावर पाकिस्तानी पत्रकार हमीद मीर बरेच संतापले. झाले असे की, इस्लामाबादमधून एका कवीचे अपहरण करण्यात आले. मात्र या कृत्याची जबाबदारी स्वीकारण्याचे नैतिक धैर्य ते करणाऱ्यांमध्ये नव्हते. त्यामुळेच त्यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये अटक दाखवली. पुढे इस्लामाबाद उच्च न्यायालयात पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश असल्याचे वक्तव्य केले गेले. यातून या सरकारला पाकव्याप्त काश्मीरवर कब्जा करणाऱ्या सैन्याचा अधिकार मान्य आहे; परंतु पाकिस्तानी न्यायालयांना तेथील निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असा अर्थ ध्वनित होतो.

थोडक्यात, पाकव्याप्त काश्मीरला परकीय भूभाग म्हणत पाकिस्तानने काश्मीर प्रश्नाला नवी दिशा दिली आहे. सरकारी प्रवक्त्यांनी इस्लामाबाद उच्च न्यायालयात सांगितले की, सध्या चर्चेत असणारे कवी अहमद फरहाद पाकव्याप्त काश्मीरमध्ये कोठडीत आहेत. मात्र पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश असल्याने त्यांना इस्लामाबाद न्यायालयात हजर करता येणार नाही. वकिलाच्या या युक्तिवादाने न्यायालयही चकित झाले. न्यायमूर्तींनी विचारले की, पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश आहे, तर पाकिस्तानी लष्कर आणि पाकिस्तानी रेंजर्स पाकिस्तानातून तिथे कसे गेले? या वक्तव्यानंतर पाकिस्तानी सोशल मीडिया'वरही खळबळ दिसून आली. पाकव्याप्त काश्मीरबाबतच्या या महत्त्वपूर्ण विधानाने पाकिस्तानच्या अधिकृत भूमिकेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण करून भारताची स्थिती मजबूत केली आहे.पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीर हा आपला भाग असल्याचा दावा फार पूर्वीपासून केला असून आझाद काश्मीर' अशी त्याची व्याख्या केली आहे. पण सरकारी वकिलांच्या या वक्तव्याने पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भूभाग नसून पाकिस्तानच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट झाले आहे. खुद्द पाकिस्तानी अधिकारीही पाकव्याप्त काश्मीरला परकीय भूभाग मानतात, हे या विधानावरून स्पष्ट होते. या विधानाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरही व्यापक परिणाम होऊ शकतो. भारताने फार पूर्वीपासून पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेला प्रदेश मानला असून तो आपला अविभाज्य भाग असल्याचा दावा केला आहे. पाकिस्तानच्या सरकारी वकिलाच्या या वक्तव्यामुळे भारताच्या दाव्याला बळ मिळाले आहे. विश्लेषक आणि राजकीय पक्षांनी याला पाकिस्तानचे राजकीय अपयश म्हटले आहे. पण त्यामुळे आंतरराष्ट्रीय मंचावर पाकिस्तानची स्थिती कमकुवत होऊ शकते.

पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरचे दोन भागांमध्ये विभाजन केले आहे. एक मीरपूर मुझफ्फराबाद हा भाग आणि दुसरा गिलगिट बाल्टीस्तान हा भाग. यातील मीरपूर मुझफ्फराबादला पाकव्याप्त काश्मीर म्हणतात. पाकव्याप्त काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १३ हजार चौरस किलोमीटर आहे. तिथे सुमारे ४० लाख लोक राहतात. पाक संसदेने १९४७ मध्ये पाकव्याप्त काश्मीरसाठी स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र कार्यकारी मंडळ असेल, असा निर्णय घेतला. तिथे राष्ट्रपती, पंतप्रधान, त्यांचे मंत्रिमंडळ आहे आणि विधानसभाही आहे. या माध्यमातून हा प्रदेश आझाद काश्मीर' असून आमचा त्याच्याशी काही संबंध नाही, असे भासवण्याचा प्रयत्न पाकिस्तानने वारंवार केला. अर्थात ही धूळफेक आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये राष्ट्रपती, पंतप्रधान असले तरी तो देखावा आहे. तेथील सर्व कारभार इस्लामाबादमधूनच चालतो.

पाकव्याप्त काश्मीर सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. कारण या क्षेत्राच्या सीमारेषा पाकिस्तानमधील पंजाबशी, अफगाणिस्तानशी आणि चीनच्या शिनजियांग प्रांताशी जोडलेल्या आहेत. पाकव्याप्त काश्मीरमधील अराजकतावादी परिस्थितीमुळे हा भाग भारताने ताब्यात घेण्याची मागणी जोर धरत असली तरी भावनिकतेच्या पलीकडे जात वास्तवाचे भान ठेवून विचार केल्यास हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा असल्याचे लक्षात येते. मुळात पाकव्याप्त काश्मीरमध्ये याबाबत दोन मतप्रवाह आहेत. एका गटाला भारतात सामील व्हायचे आहे; तर दुसरा गट १९७१ मध्ये भारताने मुक्ती वाहिनीच्या माध्यमातून स्वतंत्र बांगला देशाची निर्मिती केली तशाच प्रकारे पाकव्याप्त काश्मीर स्वतंत्र करावा अशा विचारसरणीचा आहे. तथापि, भारताने तशी मदत केल्यास जम्मू-काश्मीरमध्येही स्वातंत्र्याचे नारे दिले जाण्याची धास्ती आहे. दुसरीकडे हा प्रदेश ताब्यात घ्यायचा झाल्यास भारताला थेट युद्ध करावे लागेल. गेल्या ७५ वर्षांमध्ये भारताने कधीही शेजारी राष्ट्रांवर आक्रमण केलेले नाही.सामरिकदृष्ट्या भारत पाकिस्तानपेक्षा कितीही बलशाली असला तरी त्याने पाकिस्तानवर आक्रमण केलेले नाही. शिवाय पाकव्याप्त काश्मीरमध्ये चीनचेही हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे सर्जिकल स्ट्राईक, जागतिक पातळीवरील छोटे-मोठे सशस्त्र संघर्ष, युद्धजन्य स्थिती, जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा असणारे कलम ३७० रद्द करणे या बाबी आणि पाकव्याप्त काश्मीरसारखा भूभाग पुन्हा भारतात सामील होणे या दोन पूर्णपणे वेगळ्या बाबी आहेत. म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीकडे भारत तटस्थपणे पाहत आहे. तिकडे आर्थिक दिवाळखोर झालेला पाकिस्तानही पाकव्याप्त काश्मीरच्या विकासासाठी भरीव गुंतवणूक करण्यास सक्षम नाही. थोडक्यात, पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांचा संघर्ष सुरू राहण्याची शक्यता आहे. येणाऱ्या काही वर्षांमध्ये मात्र पाकिस्तानचे विभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये बलुचिस्तानसह पाकव्याप्त काश्मीर वेगळा होतो की भारतात सामील होतो हे काळच दाखवून देईल.

**–प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

# गाडी चालवताना या पाच चुका केल्या तर एअरबॅग देखील शकणार नाही तुमचे प्राण वाचवू

आता लोक नवीन कार खरेदी करताना सेफ्टी फीचर्सकडे खूप लक्ष देतात. मागणी लक्षात घेऊन कार कंपन्याही चांगल्या सेफ्टी फीचर्स असलेल्या कार बाजारात आणत आहेत. त्याचवेळी सरकारही या प्रकरणात बऱ्यापैकी सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. नुकत्याच लाँच झालेल्या इहरीरीं छउअझ मुळे भारतात कार सुरक्षेला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. कारच्या सेफ्टी फीचर्सबद्दल बोलायचे झाले, तर एअरबॅग खूप महत्त्वाच्या मानल्या जातात. टक्कर झाल्यास लोकांचे प्राण वाचविण्यात हे मदत करतात. मात्र, जर तुमच्या ड्रायव्हिंगच्या सवयी चांगल्या नसतील तर एअरबॅगदेखील तुमचा जीव वाचवू शकणार नाहीत.कारमध्ये बसवलेल्या एअरबॅग्जमुळे तुम्हाला सुरक्षित वाटतात. पण आपण काही चुका करतो, ज्यामुळे एअरबॅग उघडत नाहीत. परिणामी एखाद्याला आपला जीव गमवावा लागू शकतो. आज आम्ही तुम्हाला त्या पाच चुका सांगत आहोत, ज्यामुळे तुम्हाला अपघात झाल्यास एअरबॅगचा फायदा मिळणार नाही. या पाच चुका केल्या, तर पुन्हा अशा चुका न करण्याचा प्रयत्न करा.

लगेच सुधारा या ५ चुका

गाडी चालवताना या पाच चुका पडू शकतात महागात, त्यामुळे लक्षात ठेवा या पाच गोष्टी. सीट बेल्ट: सीट बेल्ट आणि एअरबॅग्स कारमधील प्रवाशांचे संरक्षण करण्यासाठी एकत्र काम करतात. ही गोष्ट हलक्यात घेतली, तर दुसरी चालणार नाही.




कार अपघात किंवा टक्कर झाल्यास या दोन गोष्टी तुमचे संरक्षण करतात. जर तुम्ही सीट बेल्ट घातला नसेल, तर एअरबॅगचाही उपयोग होणार नाही. जर सीट बेल्ट घातला नाही, तर एअरबॅगमुळे जास्त नुकसान होऊ शकते. अपघात झाल्यास जीवही गमवावा लागू शकतो. शरीराचा काही भाग बाहेर काढणे: कारच्या प्रवासाचा आनंद घेण्यासाठी लोक आपले हात किंवा डोके काचेच्या बाहेर काढतात. असे करणे धोकादायक ठरू शकते. जर तुम्हालाही तुमच्या शरीराचा काही भाग गाडीतून बाहेर काढण्याची सवय असेल, तर भविष्यात असे करू नका. डोके किंवा हात बाहेर राहिल्यास एअरबॅग देखील मदत करू शकणार नाही. मागील सीट बेल्ट न लावणे: फ्रंट सीट बेल्टप्रमाणेच मागील सीट बेल्ट देखील सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. जर मागच्या प्रवाशाने सीट बेल्ट लावला नाही, तर टक्कर झाल्यास तो दबाव सहन करू शकणार नाही. जोरदार टक्कर झाल्यास, एअरबॅग काम करणार नाहीत, ज्यामुळे जीवितहानी होऊ शकते. बंपर गार्ड: कार सुरक्षित ठेवण्यासाठी काही लोक कारच्या पुढे बंपर गार्ड वापरतात. यामुळे जास्त नुकसान होऊ शकते. एअरबॅग्स सेन्सरद्वारे काम करतात, परंतु जर बंपर गार्ड असेल, तर एअरबॅग कधी उघडायच्या हे ठरवू शकत नाहीत. या कारणास्तव त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे, आणि यासाठी एक भारी चलन देखील आहे. एअरबॅग्ज व्यवस्थित काम करतात याची खात्री करण्यासाठी, बंपर गार्ड बसवू नका. मद्यपान करून वाहन चालवणे: मद्यपान करून वाहन चालवणे बेकायदेशीर आहे. तुम्हाला केवळ चलन भरावे लागू शकत नाही, तर तुमचा जीवही गमवावा लागू शकतो. नशेच्या अवस्थेत नियंत्रण नसते, अपघाताचा धोका वाढतो. म्हणून, मद्यपान करून वाहन चालवू नका आणि स्वत:च्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी गाडी चालवण्याच्या चांगल्या सवयी लावा.

# चांगुलपणाचा गैरफायदा



एका मंदिराच्या शेजारी एक तलाव होता. तलावाजवळच एक वारुळ होते. त्या वारुळात एक भयंकर विषारी साप राहात होता. तो मंदिरात किंवा तलावात येणाऱ्या जाणाऱ्यांना त्रास देत असे. कित्येक लोक, वृद्ध, बालके त्यांच्या दंशाला बळी पडली होती.

एकदा त्या मंदिरात एक साधू आला. साधूला विषारी सापाविषयी लोकांनी माहिती सांगितली. तो साधू खूप तपस्वी होता. त्याने त्या वारुळाजवळ जाण्याचे ठरविले.



दुसऱ्या दिवशी स्नान करून त्या वारुळाजवळ येताच त्या भयंकर सापाने आपला फणा काढून साधूला अडवले. तो त्याला डसणार इतक्यात तो साधू उत्तरला, अरे, तू असा कितीजणांना डसणार आहेस? निरापराध लोकांची बळी घेऊन आपल्या पापात वाढ करत आहेस? जरा तू पुण्याचा मार्ग स्वीकार. साधूच्या उपदेशामुळे सापाचे परिवर्तन झाले. त्यानंतर काही दिवसांनी साधू त्याच वाटेवरून जात असताना तो साप वारुळाजवळ पडून असल्याचे दिसते. त्याला खूप जखमा झाल्या होत्या. लहान मुले त्याला सतत डिवचत आनंद लुटत होती. साधूने विचारले ही अशी अवस्था कशामुळे झाली? लोकांचा त्रास बंद केल्यामुळे ते मला डिवचतात. साधू म्हणाला, अरे बाबा, लोकांना त्रास द्यायचा नाही पण स्वत:च्या संरक्षणासाठी निदान तू फुत्कार काढून तरी भीती दाखवू शकत होतास ना?

**कथा उपदेश :** चांगुलपणाचा कोण गैरफायदा घेत असेल तर त्यास जरूर शासन केले पाहिजे.

## राशी भविष्य



१८ जून २०२४ –

मेष : शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम
व्यापारातील विचार सार्थक ठरतील. कार्यकुशलता, परिश्रमचे मिळेल. उत्तरदायित्वाची पूर्तता करु शकाल. प्रलंबित कामे पूर्ण होतील. नात्यांमध्ये संबंधाची मर्यादा कायम राखा.

वृषभ : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर
विश्वासाचे वातावरण राहिल. कुटूंबात योग्य ती कामे होतील. कामाच्या प्रशंसतेचे योग संभवतील. उतावळपणाने कोणतेही काम करु नका.

मिथुन : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
उद्योग-धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करु नका. डोके शांत ठेवावे लागेल. आर्थिक स्थिती चिंता वाढवणारी होऊ शकते. आईच्या प्रकृतीची काळजी घ्यावी लागेल. परमेश्वराविषयी आस्था वाढेल.

कर्क : शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
कामकाजात वाढ होईल, परंतू कामाचे योग्य फळ पदरात पडेल. कौटूंबिक परिस्थिती समाधानी राहील. व्यापारात नवीन परंतू फायद्याचे अनुबंध होतील. प्रवासात सावधानी बाळगा.

सिंह : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
लाभाच्या संधी येतील. कामाविषयी उत्साह काय राहिल. दुसऱ्यांची मदत करुन मानसिक सुख मिळवाल. अचानक प्रवासाचा योग संभवेल. बोलताना संयम राखा.

कन्या : शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कामकाजात विस्तार होऊ शकेल. वेळेचा दुरुपयोग करु नका. मोठया लोकांशी भेटी-गाठी वाढतील. आर्थिक स्थिती सुधारण्याचे योग आहेत.

तुळ : शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत. मोठया लोकांशी भेटी होतील. प्रगतीच्या संधी हातातून जाऊ देऊ नका. मुलांकडून सुख, शांती लाभेल.

वृश्चिक : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. विनाकारण एखाद्याशी वाद होऊ शकतो. कामकाज साधारण राहील. संयमाने कामे हताळा. कुटूंबाकडून सहकार्याची अपेक्षा ठेऊ नका.

धनु : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
कठिण तसेच जबाबदारीच्या कामात विशेष सावधानतेचा परिचय द्यावा लागेल. कार्यकुशलता वाढल्याने कठिण कामेही पूर्ण करु शकाल. आपले महत्तव मान्य केले जाईल.

मकर : शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
धैर्य आणि सहनशीलता राखा. तसेच बुद्धिमतेने कामे हताळा. नवीन योजना तयार होतील. उधारी मिळेल. व्यापार-व्यवसाय चांगला राहिल. व्यर्थ दिखाव्यापासून दूर रहा.

कुंभ : शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
नोकरीत अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सहचरणी सोबतच्या संबंधात गोडवा येईल. सत्कर्मा विषयी रुचि वाढेल. कर्ज घेण्याचा विचार करु नका. मंगलमय कार्यक्रमांवर चर्चा होईल.

मीन : शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम
अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. धार्मिक आस्था वाढेल. व्यापार-व्यवसाय चांगला चालेल. संपत्तीच्या खरेदी-विक्रीतून फायदा होईल. खर्चात कपात करा.

१८ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सूर्य, शनी, मंगळ व बुधाचा प्रभाव आहे. तुमच्याकडे उत्साह प्रचंड असतो. आपल्या उत्साहाने तुम्ही इतरांनाही प्रभावित करता. प्रत्येक बाबतीत अग्रेसर राहण्याची तुमची वृत्ती असते. कुणाच्या हाताखाली काम करणे तुम्हाला आवडत नाही. तुम्ही बरेचसे भावनाशील आहात. भावनेच्या आहारी जाऊन तुम्ही कोणतेही काम हाती घेता. नंतर मात्र चिकाटी व सातत्याने ते पूर्ण करता. संताप तुम्हाला लवकर येतो. पण तुम्ही लवकर शांतही होता. मैदानी व मर्दानी खेळात सहज प्रभुत्व मिळवू शकता.
प्रथम कृती नंतर विचार ही पध्दत चांगली नाही. आधी साधकबाधक विचार करून मगच कामाला हात घाला. स्वत:च्या हिमतीवर पुढे जातांना इतरांचीही मदत घ्या. संताप, त्रागा यामुळे डोकेदुखी, उच्च रक्तदाबाचे विकार होतील. भावना ताब्यात ठेवण्यासाठी ध्यान आवश्यक.

कार्यक्षेत्र : तुमच्या साहसी वृत्तीमुळे तुम्ही पोलिस, संरक्षणदल, हवाई वा नाविक दल या क्षेत्राकडे आकर्षिले जाता. तेथे तुमचा उत्कर्ष झपाट्याने होण्याची शक्यता आहे. तंत्राज्ञानात गती असल्याने इंधने, ऊर्जा, विज, यंत्रदुरूस्ती, ऑटोमोबाईल्स इत्यादी शाखात अभियांत्रिकीची महत्वाकांक्षा असल्याने त्या क्षेत्रात पुरेशा अनुभवानंतर स्वत:चा व्यवसायही सुरू करू शकाल.

प्रणयी जीवन : आपल्या कर्तबगारीची योग्य दखल घेणारा व तिचे कौतुक करणारा जोडीदार तुम्हाला हवाअसतो. जोडीदाराने तुमच्यावर वर्चस्व गाजवलेले तुम्हाला सहन होत नाही. प्रणयात उत्कटतेने प्रतिसाद देण्यालाही तुम्ही महत्व देता. सौंदर्य हा निवडीचा निकष तुम्ही मानता. या दृष्टीने एप्रिल २१ ते मे २० दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती तुमच्या अनुरूप ठरतील.

वर्षफळ : बचतीचे अंदाजप्रत्रक अमलात आणू शकल्याने मनाला समाधान वाटेल. नव्या शासकीय धोरणांचा फायदा होईल. फेब्रुवारी मार्च मध्ये कारखानदार उद्योगपतींशी संबंध प्रस्थापित होईल. एप्रिल मे मध्ये नवी आव्हाने पेलून यशस्वी करून दाखवाल. जून जुलै मध्ये बौध्दिक क्षेत्रात आपला ठसा उमटवता येईल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये प्रशिक्षणासाठी निवड होण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये प्रीतीच्या आठवणींना पुनश्च उजाळा मिळेल.
महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२.
भाग्यरत्न : पोवळे
याच तारेखेची व्यक्ती : गिल

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com







## सोनाक्षी सिन्हाची लग्न पत्रिका पाहता डेझी शाह म्हणाली, शत्रुघ्न जी योग्य होते, आजकालची मुले...

मुंबई,१६-बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. खरंतर चर्चानुसार, सोनाक्षी ही २३ जून रोजी लॉन्ग टाइम बॉयफ्रेंड झहीर इकबालशी लग्न बंधनात अडकणार आहे. तिचे डिजिटल लग्नाची पत्रिका देखील सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. यावर आता अभिनेत्री डेजी शाहने तिची प्रतिक्रिया दिली आहे.सोनाक्षी सिन्हाच्या लग्नाची सगळीकडे चर्चा सुरु असताना डेझी शाहला इन्स्टंट बॉलिवूडशी बोलताना डेझी शाहला सोनाक्षी सिन्हाच्या लग्नाविषयी प्रश्न विचारण्यात आला. तर तिने सांगितले ज्या लोकांना माहित होते त्यांना आश्चर्य झाले नाही आणि त्यांच्यापैकी मी एक आहे. वेडिंग कार्डविषयी बोलताना पुढे डेझी म्हणाली कोणाला आमंत्रण देण्याची एक चांगली पद्धत आहे. मला तर हे खूप आवडले. हे कोणत्याही पारंपारिक लग्नाच्या पत्रिकेसारखे नाही. त्यांनी बॅकग्राऊंडला स्नो ठेवले आहे. हे फार मॉर्डन आणि फ्रेश आहे. आजकालच्या काळाप्रमाणे आहे. जसे सोनाच्या वडिलांनी सांगितले आजकालची मुले माहिती देतात, परवानगी मागत नाहीत. त्यासाठी हे अगदी बरोबर आहे.सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इकबालच्या डिजिटल वेडिंग कार्टमध्ये सोनाक्षी आणि जहीर एका ऑडियोच्या मदतीने त्यांच्या मित्रांना पत्रिका पाठवत आहेत. त्यात ते म्हणत आहेत की आमच्या सगळ्या अद्भुत, टेकनीक लव्हर आणि गुप्तहेर मित्र आणि कुटुंबियांना, जे इथपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत, सगळ्यांना नमस्कार. गेल्या सात वर्षात एकत्र असण्यापासून, प्रेम, आनंद, हसणे आणि अनेक अॅडव्हेंचर आम्हाला इथपर्यंत घेऊन आले आहेत. एकमेकांचे रुमर्ड गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंड असण्यापासून आम्ही एकमेकांचे अधिकृत पती-पत्नी होणार आहोत. तर तुमच्याशिवाय हे अपूर्ण आहे. त्यामुळे २३ जून रोजी तुम्ही जे काही करत असाल ते सगळे सोडा आणि आमच्या या सोहळ्यात सहभागी व्हा.दरम्यान, त्या दोघांच्या लग्नाच्या सोहळ्यात अनेक लोक हजेरी लावणार आहेत. त्यात हनी सिंगचे देखील नाव आहे. तर सोनाक्षी आणि झहीरच्या लग्नाविषयी बोलायचे झाले तर तर त्यांच्या या सोहळ्यात प्रॉपर ड्रेस कोड ठेवण्यात आला आहे. सगळ्यांना फॉर्मल परिधान करण्यास सांगितले असून लाल रंगाचे कपडे परिधान करण्यास मनाई करण्यात आली आहे. तर या कार्यक्रमात अक्षय कुमार आणि सलमान खानसोबत इतर सुपरस्टार देखील हजेरी लावणार आहेत.

## कच्चे नव्हे हे पदार्थ खा उकडून, होतील बरेच फायदे



**मुंबई:** असे म्हटले जाते जेवण उकडणे हे ते फ्राय करण्याच्या तुलनेत चांगले असते. तुम्हाला ऐकून हैराण वाटेल मात्र काही पदार्थ तसेच भाज्या फ्राय करण्यापेक्षा त्या उकडल्याने त्यातील पौष्टिक गुण टिकून राहतात आणि शरीरास मिळतात.

**बटाटा-**
बटाटा फ्राय करण्याऐवजी सालीसकट तो उकडून खाल्ल्यास अधिक फायदे होतात. कारण असे केल्याने त्यातील व्हिटामिन सी आणि बी नष्ट होत नाही आणि क्लरीजचेही प्रमाणही कमी होतात.रताळे-रताळे उकडून खाल्ल्याने त्यातील बीटा कॅरोटिन सुरक्षित राहते. हे एक चांगले अँटीऑक्सिडंट आहे जे शरीरात जाऊन व्हिटामिन एमध्ये रुपांतरित होते. हे डोळे, इम्युन फंक्शन आणि त्वचेच्या आरोग्यासाठी चांगले आहे.

**अंडी-**अंडी उकडून खाल्ल्याने त्यातील प्रोटीन पचायला सोपे जाते. अनेकजण कच्चे अंडे अथवा फ्राय करून खा-तात मात्र ते उकडून खाणे चांगले असते.**गाजर-**अनेक रिसर्चमध्ये असे समोर आले आहे की गाजर उकडल्याने त्यातील सेल वॉल तुटून जातात यामुळे शरीरातील बीटा कॅरोटीन शोषून घेणे सोपे जाते.

# महिला सेंद्रिय शेतकरी




राजस्थानातील दौसा जिल्ह्यातील महुआ गावातील रुबी पारीक अवघ्या एक वर्षाची होती. तेव्हा तिचे बाबा कर्करोगाने गेले. रुबी आणि तिच्या कुटुंबासाठी हा खूप मोठा आघात होता. उत्पन्नाचं साधन नसल्याने आर्थिक तंगी होती. रुबीला दहावीनंतर शिकायचं होतं मात्र पुढील शिक्षणासाठी जावं लागणारी शाळा लांब होती. कुटुंब पुराणमतवादी असल्याने त्यांची इच्छा नव्हती की, रुबीने हायस्कूल पूर्ण केल्यानंतर अभ्यासासाठी लांब जावे. ग्रामीण भागातील शिरस्त्याप्रमाणे २००३ मध्ये, १९ वर्षांची झाल्यावर दौसाच्या खटवा गावात ओम प्रकाश पारीक यांच्याशी रुबीचं लग्न झाले.लग्नानंतर तिचे आयुष्य बदलले. तिच्या सासरी कुटुंबाकडे १२.३ एकर शेतजमीन होती. या ठिकाणी रासायनिक खतांचा वापर करून ते शेती करत असत. कुटुंब शेतीत खूप कष्ट करत होते. पण उत्पन्न जेमतेम उदरनिर्वाहापुरतेच व्हायचे. रसायनांची किंमत, संकरित बियाणे आणि पाण्याची जास्त गरज यामुळे नफा जेमतेम व्हायचा. रुबी शेतीच्या कामात रस घेऊ लागली. तिच्या पतीने तिला आपले अनुभव सांगून शिकण्यासाठी प्रोत्साहित केले. २००६ मध्ये, स्थानिक कृषी विज्ञान केंद्रच्या टीमने गावाला भेट दिली आणि गव्हाच्या विविध जातींचे प्रदर्शन केले. रुबी त्या सत्राला उपस्थित राहिली. रासायनिक शेतीला पर्याय आहे का?' तिने प्रश्न केला. सेंद्रिय शेती हा त्यावरचा उपाय आहे असे तिला कृषी शास्त्रज्ञांनी सांगितले. त्यांनी तिला सेंद्रिय शेतीच्या तीन दिवसांच्या प्रशिक्षणासाठी येण्यास सांगितले.

मात्र परंपरावादी कुटुंबातील सून असल्याने घराबाहेर पडणे तिच्यासाठी सोपे नव्हते. रुबीच्या पतीने मात्र तिला पाठिंबा दिला आणि प्रशिक्षण सत्रास जाण्यास प्रोत्साहन दिले. रुबी प्रशिक्षणासाठी गेली. प्रशिक्षणाला उपस्थित राहिल्यानंतर आणि कुटुंबासह शेतावर काम केल्यानंतर रुबीला काही अनुभव आले. तिने तिच्या सासरच्यांना विनंती केली की, तिला सुमारे १ एकर जमिनीवर सेंद्रिय शेतीचा प्रयोग करण्याची परवानगी द्यावी. सासऱ्यांनी होकार दिला. रुबीला हुरूप आला. तिने शेतात गवार, मोहरी आणि इतर काही पिके घेतली. पण पहिल्या वर्षी रासायनिक शेतीच्या तुलनेत उत्पन्न कमी होते. ते पाहून तिच्या सासरच्यांनी रुबीला सेंद्रिय शेतीपासून दूर राहायला सांगितले. रुबीने वेगळी पद्धत अवलंबली. तिने शेण, गोमूत्र, कडुलिंबाची पाने आणि शेतातल्या पाळापाचोळ्याचा वापर करून सेंद्रिय खत तयार करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे वर्षानुवर्षे रासायनिक वापरामुळे नष्ट झालेल्या जमिनीची सुपीकता सुधारली. गांडूळ खत बनवायलाही ती शिकली.

सेंद्रिय खतांच्या वापरामुळे पिकांचे उत्पादन वाढू लागले. २००८ मध्ये, नाबार्ड (नॅशनल बँक फॉर ग्रीकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट) च्या अधिकाऱ्यांनी तिच्या शेताला भेट दिली आणि तिला गांडूळ खताचे युनिट लावण्यास प्रोत्साहित केले. २०० मेट्रिक टन सुविधा उभारण्यासाठी नाबार्डने रुबीला ५० टक्के अनुदान दिले. त्यावेळी हे राजस्थानमधील सर्वात मोठे गांडूळ खत युनिट होते. हे युनिट टर्निंग पॉइंट ठरले. अनेक महिला सेंद्रिय शेती प्रशिक्षणासाठी रुबीच्या शेतात येऊ लागल्या. रुबी इतरांना सेंद्रिय शेती आणि गांडूळ खत निर्मितीचे प्रशिक्षण देऊ लागली. तिने आतापर्यंत १५,००० हून अधिक लोकांना प्रशिक्षण दिले आहे. सेंद्रिय खताचे हे युनिट दरमहा २०० क्विंटल (२०,००० किलो) गांडूळ खत तयार करते आणि ते रुपये ६ प्रति किलो दराने विकले जाते. म्हणजे महिन्याला १,२०,००० रुपयांची कमाई होते.

रुबीचे पती ओम प्रकाश यांनीही दौसा, सवाई माधोपूर आणि भरतपूरसह सात जिल्ह्यांतील १०० हून अधिक लोकांना गांडूळ खत तयार करण्याचे प्रशिक्षण दिले आहे. ते १२५ रुपये प्रति किलो या सरकारी दराने गांडूळ खत विकतात. पण त्याचसोबत अनेक गरजू शेतकऱ्यांना गांडूळ खत, गांडुळे आणि इतर आवश्यक गोष्टी मोफत देतात जेणेकरून ते सेंद्रिय शेतीकडे वळू शकतील. अनुभव आणि प्रशिक्षणातून शिकून, रुबी आता अझोला वनस्पती देखील तयार करते. ही वनस्पती वातावरणातील नायट्रोजनचे निराकरण करण्याच्या क्षमतेमुळे खत म्हणून वापरले जाते.गुरांसाठी कोरड्या चाऱ्यात मिसळल्यास दुधाचे प्रमाण आणि गुणवत्ता सुधारते. अझोला ही एक जलचर वनस्पती आहे. जी १० फूट ु १० फूट आकाराच्या प्लास्टिक युनिट्समध्ये किंवा खड्ड्यात तयार करता येते. खड्ड्याची खोली एक फूट असते. रुबीकडे पाच अझोलाचे थर आहेत. प्रत्येक खड्ड्यात ते सुपीक माती, काही प्रमाणात शेण आणि ५ किलो अझोलाच्या बिया टाकतात. ते गांडूळ खताच्या थरामध्ये अझोला वनस्पती देखील घालतात. दुधाचे उत्पादन घेणारे पशुखाद्यासाठी ते विकत घेतात. रुबी दर महिन्याला सुमारे ३ क्विंटल (३०० किलो) अझोला विकते. कालांतराने, रुबीच्या कुटुंबालाही सेंद्रिय शेतीचे फायदे दिसू लागले आणि आज त्यांची १२ एकर जमीन पूर्णपणे सेंद्रिय-प्रमाणित आहे. आज त्यांच्या शेतात १०,००० झाडे आहेत. रुबीकडे बियाणे बँक देखील आहे जिथून शेतकरी नाममात्र दरात देशी वाण खरेदी करतात. अधिकाधिक शेतकऱ्यांशी संवाद साधताना रुबीने त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे मार्केटिंग करणे हे सर्वात आव्हानात्मक आहे हे तिला उमजले. या आव्हानातून २०१५ मध्ये, तिने एक शेतकरी उत्पादक संघटना स्थापन केली. या शेतकरी उत्पादक संघटनेचे ५०० पेक्षा जास्त सदस्य आहेत. रुबी खटवा किसान जैविक प्रोड्युसर कंपनी लिमिटेडची व्यवस्थापकीय संचालक आहे. ही कंपनी शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना उत्पादन विकण्यास मदत करते.शेतकऱ्यांना आता मंडईत जाण्याची गरज नाही. खरेदीदार, बहुतेक स्थानिक सरकारी अधिकारी आणि व्यावसायिक ज्यांना सेंद्रिय अन्नाचे महत्त्व माहीत आहे ते थेट शेतातून खरेदी करतात. शेतकऱ्यांना वाहतूक, वर्गीकरण किंवा प्रतवारीवर कोणताही पैसा खर्च न करता बाजारभावापेक्षा ४० ते ५० टक्के अधिक नफा मिळतो. इतकंच नव्हे तर रासायनिक शेतीतून सेंद्रिय शेतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांना कंपनी आर्थिक सहाय्य देखील पुरवते.मुलगी शिकली प्रगती झाली' या धर्तीवर एक महिला शेतकरी सेंद्रिय शेतकरी झाली तर गावाची, जिल्ह्याची पर्यायाने समाजाची प्रगती होते हे रुबी पारीक यांनी सिद्ध केले. कृषी क्षेत्रातील सर्वार्थाने त्या लेडी बॉस आहेत.-दी लेडी बॉस: अर्चना सोंडे

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

सत्यं शिवं सुंदरम्

भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे

## श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

(स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडशी संलग्न)

शैक्षणिक वर्ष २०२४-२५

भारत लिबरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर पदवी अनुदानित महाविद्यालयात तासिका तत्वावर सहाय्यद प्राध्यापकांची खालील प्रमाणे जाव वक्र. विशिसंं/उशि/नांवि/अनु-२/घ.ता./२०२३-२४/९३१ दि. ०५.०४.२०२४ च्या पत्रान्वये पदे भरावयाची आहेत, तरी अर्हता प्राप्त उमेदवारांनी दि. २२.०६.२०२४ रोजी शनिवार सकाळी ११.०० वाजता मुळ प्रमाणपत्रासह महाविद्यालयात थेट मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. (नाव नोंदणी स. ०९.०० ते १०.३० वा. राहील याची नोंद घ्यावी.)

| अ.क्र. | विषय | पद | घडयाळी तासिका पदे |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | सहाय्यक प्राध्यापक | ०२ |
| २ | मराठी | ------"------ | ०१ |
| ३ | समाजशास्त्र | ------"------ | ०१ |
| ४ | इतिहास | ------"------ | ०१ |
| ५ | लोकप्रशासन | ------"------ | ०१ |
| ६ | अर्थशास्त्र | ------"------ | ०१ |
| ७ | भूगोल | ------"------ | ०४ |
| ८ | संगीत | ------"------ | ०१ |
| ९ | वाणिज्य | ------"------ | ०५ |
| १० | रसायनशास्त्र | ------"------ | ०६ |
| ११ | संगणकशास्त्र | ------"------ | ०२ |
| १२ | भौतिकशास्त्र | ------"------ | ०१ |
| १३ | वनस्पतीशास्त्र | ------"------ | ०१ |
| १४ | प्राणीशास्त्र | ------"------ | ०१ |
| १५ | गणित | ------"------ | ०२ |
| | | एकुण | ३० |

**पदव्युत्तर विभाग (कायम विना अनुदानित)**

| अ.क्र. | विषय | पद | घडयाळी तासिका पदे |
|---|---|---|---|
| १ | मराठी | सहाय्यक प्राध्यापक | ०२ |
| २ | हिंदी | ------"------ | ०२ |
| ३ | भूगोल | ------"------ | ०२ |
| ४ | वाणिज्य | ------"------ | ०४ |

**उच्च माध्यमिक व्यावसायीक अभ्यासक्रम-शिक्षक (तासिका तत्ववारी)**

| अ.क्र. | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ०१ | M.A.,B.Ed |
| २ | हिंदी | ०१ | M.A.,B.Ed |
| ३ | फांउनडेशन कोर्से | ०१ | M.B.A./M.Com |
| ४ | पर्यावरण | ०१ | M.A./M.Com./M.Sc. |
| ५ | शारीरिक शिक्षण | ०१ | M.PEd. |

**मुलाखतीचे ठिकाण - श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर**

नोट -
१. शैक्षणिक पात्रता M.A./M.Sc.M.Com.55 %, NET/SET/Ph.D.
२. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडावे.
३. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता दिला जाणार नाही.
४. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावे.

**अॅड. गुणवंतराव पाटील हैबतपूरकर**
अध्यक्ष, भा.लि.ए.सोसायटी, उदगीर

**श्री. उमेश माणिकराव पाटील**
सचिव, भा.लि.ए.सोसायटी, उदगीर

**प्रा.डॉ. एन.जी. एमेकर**
प्र.प्राचार्य, श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

**टी.सी हरवली आहे**

माझी मनिषा संजय राठोड या नावाची इ. १० वी पासची मुळ टि.सी. दि. १०/१२/२०२३ रोजी उदगीर नगर परिषद ते बसस्टॅड परिसरात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास संपर्क साधावा
मो. नं. ७७५६०९९५००

**झाडे लावा झाडे जगवा**

---

**जाहीर प्रगटन**

### उदगीर येथील जिल्हा न्यायाधिश-१ यांचे न्यायालयात,

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३/२०२४ निशाणी क्रमांक ०९

रामराव पि. सर्जेराव खटके
वय १४ वर्षे, अज्ञान पालन कर्ती
सख्खी जन्मदाती आई
शोभाबाई भ्र. सर्जेराव खटके
वय ४२ वर्षे, धंदा- शेती व घरकाम,
रा. देवर्जन, ता.उदगीर जि.लातूर

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार शांगाबाई अ. सर्जेराव खटके, वय ४२ वर्षे, धंदा - शेती व घरकाम, रा. देवर्जन, ता. उदगीर, जि. लातूर यांनी श्री. पी.आर. कापडे, विधिज्ञ, उदगीर यांच्यामार्फत अर्जदार यांचा अज्ञान मुलगा रामराव पि. सर्जेराव खटके, वय १४ वर्षे, अ.पा.क. आई शोभाबाई अ. सर्जेराव खटके, रा. देवर्जन, ता. उदगीर, जि. लातूर यांची मौजे घोणसी, ता. जळकोट, जि. लातूर येथील जमीन भुमापन क्रमांक १८२ मधिल क्षेत्र ० है. २६ आर व १८३ मधिल क्षेत्र ० है. ६३ आर तसेच मोजे घोंडवाडी येथील जमीन भुमापन कमांक १९ मधिल क्षेत्र ० है. ५० आर या जमीनीच्या विक्रीची परवानगी मिळावी म्हणून या मान्यवर न्यायालयात वरील प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

तरी जर कोणास अर्जदाराच्या सदर अर्जा संबंधी काही उजर हरकत आक्षेप असतील तर त्यांनी आपले उजर वा आक्षेप हे जाहीर प्रगटन झालेच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत लेखी स्वरुपात सादर करावे किंवा या न्यायालयात दाखल करावेत मुदतीनंतर प्राप्त होणारे उजर वा आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी तदनंतर अर्जदाराची बाजु ऐकुन घेवुन सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.
पुढील नेमलेली तारीख ०६/०७/२०२४ ही आहे.
आज दिनांक १४/०५/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आले.

(बी.के. शिंदे)
व.लिपिक
जिल्हा न्यायालय-१ उदगीर

(पी.बी.सोनाळे)
प्रा. अधिक्षक,
जिल्हा न्यायालय-१ उदगीर

---

### वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३८१/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Hanmantrao Shamrao Haibatpure हे दिनांक ०३.०४.२०२४ रोजी Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Laxmibai W/o. Hanmantrao Haibatpure, Age 71 yrs, Occu. H.H.
2) Anil S/o Hanmantrao Haibatpure, Age 54 yrs, Occu. Private Service
3) Shayam S/o Hanmantrao Haibatpure, Age 49 yrs, Occu. Private Ser.
All R/o. Udgir Tq.Udgir Dist.Latur
4) Vidhya W/o. Sangram Dhotare, Age 57 yrs, Occu. H.H.,
R/o. Pragati Colony, Sendurwafa, Sakoli, Bhandara
यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Laxmibai W/o. Hanmantrao Haibatpure | 71 | Wife |
| 2) | Anil S/o Hanmantrao Haibatpure | 54 | Son |
| 3) | Shayam S/o Hanmantrao Haibatpure | 44 | Son |
| 4) | Vidhya W/o. Sangram Dhotare | 42 | Daughter |

अर्जदार याने Hanmantrao Shamrao Haibatpure या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Hanmantrao Shamrao Haibatpure यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २८/०७/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे)
कनिष्ठ लिपिक
सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(पी.एस.देशपांडे)
सहा.अधिक्षक,
सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

---

### वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४१३/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Prakashgir S/o Ganpatgir Giri हे दिनांक २१.०६.२०११ रोजी Devnal Tq.Baswakalyan Dist. Bidar येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Mangala W/o. Prakash Giri, Age 73 yrs, Occu. H.H.,
2) Dipak S/o. Prakasha Giri, Age 48 yrs, Occu. Service,
Both Bhagya Nagar, Shelhal Road, Udgir Tq.Udgir dist.Latur
3) Sachin S/o. Prakash Giri, Age 43 yrs, Occu. Service,
R/o. Plot No. 604, Mantra Magic, Gat No. 789, Chimbali Pune
4) Varsha S/o. Prakash Giri, Age 45 yrs, Occu. Service and H.H.,
R/o. Tamsa Tq.Hadgaon Dist.Nanded
यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Mangala W/o. Prakash Giri | 73 | Wife |
| 2) | Dipak S/o. Prakasha Giri | 48 | Son |
| 3) | Sachin S/o. Prakash Giri | 43 | Son |
| 4) | Varsha S/o. Prakash Giri | 45 | Daughter |

अर्जदार याने Prakashgir S/o Ganpatgir Giri या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Prakashgir S/o Ganpatgir Giri यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः १८/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २२/०७/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे)
कनिष्ठ लिपिक
सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(पी.एस.देशपांडे)
सहा.अधिक्षक,
सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

---

ताबा नोटीस नमुना झेड

### प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा.लि. उदगीर, ता.उदगीर जि.लातूर

सहकार कायदा १९६० मधील कलम १५६ व नियम १०७ (११) ड-१ पाहा

स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी एन.एन.कुलकर्णी, वसुली अधिकारी, प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा. लि.उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांच्या वतीने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसा देवूनही थकबाकीदार यांनी नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम भरण्यास बजावले असतांना त्यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केला आहे.

खाली सही करणाऱ्याने सदरच्या संस्थेतील स्थावर मालमत्ता जप्त केलेल्या असून त्याचा पंचनामेही संस्थेच्या दप्तरी उपलब्ध आहे. सर्व ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोना या प्रमाणे म्हणजेच नोटीस देण्यात येते की, खालील निर्दिष्ठ केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड) १ नुसार मिळालेल्या अधिकारान्वये रितसर ताबा घेतलेला आहे. विशेष करुन ऋणकोसह तमाम नागरीकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेच्या संदर्भात कोणतीही खरेदी विक्री, गहाण, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास तो प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा. लि.उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांच्या खालील दर्शविलेल्या वसुलपात्र रक्कम व त्यावरील होणारे पुढील येणे व्याज व खर्च याच्या कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल, याची नोंद घ्यावी.

**प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा.लि. उदगीर, ता.उदगीर जि.लातूर**

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नांव व पत्ता | लवाद दाखला क्रमांक व दिनांक | स्थावर मिळकत जप्त केल्याची तारीख | वसुल पात्र रक्कम | स्थावर जप्ती मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कांबळे किशोर भानुदास रा. मलकापुर ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. बिरादार दिगंबर श्रीपतराव २. बिरादार गुरुनाथ देवराव दोघेही रा. मलकापुर ता.उदगीर जि.लातूर | २१३/१०१/२०२२ दिनांक ३१.०५.२०२२ | २१.०९.२२ | २८,३१,८९७/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. १४७/२०१८ दिनांक २१.०९.२०१८ मौजे उदगीर येथील नगर परिषद हद्दीतील मिळकत नं. ४-१-९२३ सर्वे नं. ३११ मधील प्लॉट नं. ३ | पुर्व पश्चिम-५० फुट दक्षिण उत्तर-३० फुट एकुण क्षेत्रफळ १५०० चौरस फुट |
| २ | ढोले नंदराज त्रिंबकराव रा. कपाळे गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. गुरुडे नितीन गोविंदराव रा. सरस्वती कॉलनी, उदगीर ता.उदगीर जि.लातूर २. फुलारी सतिष बाबुराव रा. फुलार गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | २१८/१०१/२०२२ दिनांक ३१.०५.२०२२ | १७.१२.२०२२ | ७,७२,५८२/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. ११६४/२०१६ दिनांक ०३.०२.२०१६ मौजे ग्राम पंचायत लोणी ता.उदगीर येथील सर्वे नं. १६/२३मधील प्लॉट नं. ७ ग्राम पंचायत मिळकत नं. १९८१ पैकी | पुर्व पश्चिम-४० फुट दक्षिण उत्तर-३० फुट एकुण क्षेत्रफळ १२०० चौरस फुट |
| ३ | मदनुरे रोहिदास भाउराव मु.पो. लोणी ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. सोलापुरे श्रीमंत बसवंतराव २. मदनुरे लहु शहाजीराव दोघेही रा. मु.पो. लोणी ता.उदगीर जि.लातूर | ११५५/१०१/२०१८ दिनांक १९.११.२०१८ | १७.१२.२०२२ | १,४४,३९२/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. २०२७/२०१३ दिनांक १८.०९.२०१३ मौजे सोमनाथपुर ग्राम पंचायत हद्दीतील मिळकत क्रं. १५७४ | पुर्व पश्चिम-३५ फुट दक्षिण उत्तर-२० फुट एकुण क्षेत्रफळ ७०० चौरस फुट |
| ४ | उदाजी किसनराव शामराव रा. नोबल कॉलनी, उमा टॉकीजच्या पाठीमागे उदगीर ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. जोमदे नरसिंग अमतराव रा. हमालवाडी उदगीर २. उदाजी सचिन किसनराव रा. नोबेल कॉलनी, उमा टॉकीजच्या पाठीमागे, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ११५१/१०१/२०१८ दिनांक १९.११.२०१८ | २१.०९.२०२२ | ६,८०,८२५/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. ५८२/२०१३ दिनांक १६.०२.२०१३ मौजे उदगीर येथील नगर परिषद हद्दीतील मिळकत क्रं. ४-२-३१५ जुना, ४-२-३४० नवीन | पुर्व पश्चिम-२० फुट दक्षिण उत्तर-३० फुट एकुण क्षेत्रफळ ६०० चौरस फुट |
| ५ | जिरगे पद्मीनबाई सुभाष रा. समता नगर, उदगीर ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. रोहिदास कलाप्पा लोहारे रा. मु.पो. बनशेळकी रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर २. जळकोटे अमीरोद्दीन सुजाओद्दीन रा. खाटीक गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ९९२/१०१/२०१९ दिनांक ०८.११.२०१९ | १९.१२.२०२२ | १५,४९,७९८/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. ३७९६/२०१४ दिनांक १६.०७.२०१४ मौजे उदगीर येथील नगर परिषद हद्दीतील मिळकत क्रं. ४-१-८९८ जुना, ४-२-६४८ नवीन | पुर्व पश्चिम-३५ फुट दक्षिण उत्तर-४५ फुट एकुण क्षेत्रफळ १५७५ चौरस फुट |
| ६ | नावंदीकर विद्याप्रसाद रामचंद्र रा. आनंद नगर, नांदेउ रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर जामीनदार १. राजेश तुकाराम अंधारे रा. फुले नगर, सोमनाथपुर रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर २. भारत तुकाराम शेळके रा. मु. पो. नावंदी ता.उदगीर जि.लातूर | १११२/१०१/२०१९ दिनांक ०४.१२.२०१९ | २१.०९.२०२२ | ९,१४,७५९/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. ४५२७/२०१५ दिनांक ११.०८.२०१५ मौजे उदगीर येथील नगर परिषद हद्दीतील सर्वे नं. १४/ब मधील प्लॉट नं. १७ मधील मिळकत जुना क्र. २-२-१३८६ नवीन क्र. २२२९ | पुर्व पश्चिम-४३ फुट दक्षिण उत्तर-४० फुट एकुण क्षेत्रफळ १७२० चौरस फुट |
| ७ | सय्यद युनूस पाशा पिरपाशा रा. किल्ला गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर १. अहमद जाफरसाब मणियार रा. शेल्हाळ रोड, खैर नगर, उदगीर ता.उदगीर जि.लातूर २. सय्यद पिरपाशा सय्यद खाजा रा. किल्ला गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर ३. बशरोद्दीन अमीरसाब मणियार रा. किल्ला गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ११४९/१०१/२०१९ दिनांक १९.११.२०१८ | १९.१२.२०२२ | १०,०९,२७३/- + व्याज + खर्च | गहाणखत दस्त क्र. ३८९/२०१४ दिनांक २७.०५.२०१४ मौजे निडेबन ता.उदगीर येथील ग्राम पंचायत सर्वे नं. ११७/०२ मधील प्लॉट नं. २४/०१ ज्याचा ग्राम पंचायत मिळकत नं. ५५०४ | पुर्व पश्चिम-३५X४३ फुट दक्षिण उत्तर-२४.६X२३ फुट एकुण क्षेत्रफळ ८९७ चौरस फुट |

टिप : ही नोटीस प्रसिध्द केलेल्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत आपण आपल्याकडे येणे असलेली थकबाकी, व्याज व खर्चासह प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा. लि. उदगीर, ता.उदगीर जि.लातूर यांचे मुख्य कार्यालयात भरणा करुन त्याचा बेबाक दाखला (निल दाखला) घ्यावा अन्यथा कलम १५६ निमय १०७ (११) ड-१ अन्वये सदरील मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा/कब्जा घेणेकरीता मा. जिल्हा दंडाधिकारी साहेब, लातूर यांच्याकडे रितसर दावा दाखल करुन सदरील स्थावर मिळकतीचा ताबा घेतला जाईल, याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे या करीता होणाऱ्या खर्चाची व परिणामाची जबाबदारी सदरील थकबाकीदार यांची असेल.
ही ताबा नोटीस दिली. ता. १५.०६.२०२४

शिक्का

वसुली अधिकारी,
प.पु. कुमारस्वामी अर्बन को.ऑप. सोसा.लि.
उदगीर ता.उदगीर जि.लातूर

---





**उदगीर मनोरंजन**

**कल्पना** 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया, अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे, सचिव



# व्यवहारकुषल, ज्ञानी अशी ओळख असलेल्या माहेश्वरी समाजाने राज्यात आपले अस्तीत्व प्रस्थापित केले

## महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा अध्यक्ष मधुसूदन गांधी यांचे प्रतिपादन




लातूर/ प्रतिनिधी- समाजाला उत्कर्षाकडे न्यायचे असेल तर, सकारात्मकतेने पुढे गेले पाहिजे, समाजातील प्रत्येकाने आपापला इगो बाजूला ठेवून समाजासाठी काम केले तर आपल्या समाजाची उन्नती अटळ आहे. आपला व्यवहारकुषल, ज्ञानी अशी ओळख असलेल्या माहेश्वरी समाजाने राज्यात आपले अस्तीत्व प्रस्थापित केले. याचे मोठे समाधान आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा अध्यक्ष मधुसूदन गांधी यांनी केले. ते लातूर जिल्हा माहेश्वरी सभाच्या वतीने आयोजित महेश पुरस्कार समारंभ प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे संयुक्त मंत्री जुगलकिशोरजी लोहिया यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे मराठवाडा उपाध्यक्ष राजकुमारजी पल्लोड, मंत्री महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी सभा सत्यनारायणजी सारडा, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी युवा संघटन अध्यक्ष विनितजी तोष्णीवाल, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी सभा संयुक्त मंत्री नंदकिशोरजी तोतला, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी सभा भूतपूर्व अध्यक्ष श्रीकिशनजी भन्साळी, ओंकरनाथजी मालपाणी महाराष्ट्र महेश सेवा निधी कार्याध्यक्ष ब्रिजगोपलजी तोष्णीवाल, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी सभा भूतपूर्व मंत्री मदनलालजी मणियार, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी सभा जनसंपर्क मंत्री ओमप्रकाशजी तापडिया, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी महिला संघटन प्रदेश उपाध्यक्ष अनिताजी अशोकजी मालू, महाराष्ट्र प्रदेश महेश्वरी युवा संघटन व सहकार मंत्री रामजी भुतडा यांची प्रमुख उपस्थिती होती .

यावेळी समाजासाठी अतुलनिय योगदान देणाऱ्यांचा माहेश्वरी समाजातील अनेक समाजबांधवांनी समाजासाठी अतुलनिय योगदान दिले आहे. अशा मान्यवर व्यक्तींचा समाजाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महेश भूषण, महेश गौरव, व महेश रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रल्हाद रामगोपाल बाहेती, लक्ष्मीनारायण रामानुज गिल्डा, राजकुमार हरिकिशन सोनी, यांना महेश सेवा पुरस्कार, कुमुदिनी शामसुंदर भार्गव, डॉ. पवन सत्यनारायण लड्डा, डॉ. हनुमान विष्णुदास चांडक यांना महेश गौरव, तर यावर्षी प्रथमच स्व. प्रदिप धूत यांना मरणोत्तर महेश रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याबरोबरच माहेश्वरी आवास योजनेसाठी १ एकर जमीन दान देणाऱ्या अलका साडी सेंटरचे संचालक आलोक धूत, ओमप्रकाश डागा, गौरव बाहेती, प्रकाश लाहोटी, पुरुषोत्तम कालिया, लक्ष्मीकांत कालिया, मधुसूदन भुतडा, मंत्रराज भुतडा, जयराम भुतडा, हृषीकेश भुतडा, हेमंत नावंदर, अभिषेक नावंदर, अशोक भुतडा, नुरवी सागर गिल्डा,नंदकिशोर बलदवा, धनराज पल्लोड, सुनील राठी, बलाकिषन मुंदडा, शाम भट्टड यांचाही समाजाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे संयुक्त मंत्री जुगलकिशोरजी लोहिया यांनी लातुरात रत्नांची खान आहे. येथे माहेश्वरी सभेचे अनेक चांगले काम सूरू असुन, येथे आले की ऊर्जा मिळते अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. पुरस्कार प्राप्त यांच्या वतीने कुमुदिनी भार्गव आपले मनोगत व्यक्त करतांना समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत हे पुरस्कार त्यांनी समाजासाठी काम करणाऱ्या प्रतयेकाला समर्पित केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात लातूर जिल्हा माहेश्वरी सभा अध्यक्ष सी ए प्रकाश कासट यांनी माहेश्वरी सभा लातूरच्या वतीने राबवीत असलेल्या उपक्रमांची महिती दिली.

याशिवाय यावेळी सचिव फुलचंद काबरा, कोषाध्यक्ष जगदिश भुतडा, संघटनमंत्री विजयकुमार चांडक, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा उपाध्यक्ष ,अखिल भारतीय सदस्य हुकुमचंद कलंत्री, बलकिशन मुंदडा, उपाध्यक्ष ओमप्रकाश सारडा, जयप्रकाश खटोड, मधुसूदन सोनी, दिपक भुतडा अहमदपूर, डॉ. राजेंद्र बाहेती मुरूड, महा प्रदेश कर्यासमिती सदस्य राजेशकुमार मंत्री, संयुक्त मंत्री गोकुळदास चांडक, राजगोपाल बाहेती, सहसंघटन मंत्री पुरुषोत्तम कालिया, रामनिवास धूत, महेश आवास प्रमुख गोविंद कोठारी, सहकोशाध्यक्ष प्रल्हाद चांडक, आय टी सेल अशोक जाजू, मीडिया व प्रचार मंत्री शाम भट्टड, राजकुमार सोनी, कार्यालय मंत्री चांदकरण लड्डा, सांस्कृतिक व क्रीडा प्रमुख अजय तापडिया, महेश सेना अध्यक्ष संतोष तोष्णीवाल, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य ईश्वर बाहेती, दिलीप सोमाणी, रामेश्वर गिल्डा, नंदकिशोर सोनी, रामेश्वर भराडिया, , शामसुंदर सोनी, भारतलाल धूत, सल्लागार मंडळ लक्ष्मीरमण लाहोटी, सुरेश मालू, लक्ष्मीकांत सोमाणी, रमेश बियाणी, सुभाष सोमाणी, रमेश राठी, शामसुंदर खटोड, लातूर जिल्हा माहेश्वरी महिला संघटन मंगल लड्डा, ललिता राठी, लातूर शहर माहेश्वरी सभा ड.नंदकिशोर लोया, विष्णूप्रसाद सारडा, लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटन , युवा माहेश्वरी लातूर , माहेश्वरी किशोरी मंडळ लातूर , महेश भूषण निवड समिती प्रमुख हुकूमचंद कलंत्री, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी सदस्य आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. गोपाल बाहेती व सौ.दिपाली रांदड यांनी केले शेवटी फुलचंद काबरा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जनता दरबारात मांडल्या नराधारांसह शेतकऱ्यांच्या व्यथा

औसा :स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि निराधार संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांना खरीप २०२३ चा पीकविमा तात्काळ मिळावा आणि होऊ घातलेल्या पावसाळी अधिवेशनात निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची दरमहा ३००० रू मानधन वाढीची प्रलंबित मागणी मंजूर करावी यासह शेतकऱ्यांच्या व्यथा आ अभिमन्यू पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित जनता दरबारात शेतकरी नेते राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनी निवेदनाद्वारे मांडल्या.आज देशात शेतकरी,शेतमजूर सुशिक्षित बेरोजगार असंख्य अडचणीने ग्रस्त आहे. हाताला काम नाही, शेती निसर्गाच्या प्रकोपामुळे परवडत नाही, पीकविम्यासारखी दळभद्री योजना असून अडचण अन नसून खोळंबा अशीच झाली आहे.शेतकऱ्यांच्या नावाखाली विमा कंपनी आपलंच उखळ पांढरं करुन घेत आहे.नुकसान भरपायीसाठी अनेक निकष घातले गेलेत जे सामान्य गावगाड्यातला शेतकरी पूर्ण करूच शकत नाही. याचा सरळ अर्थच असा की सरकारचं धोरण म्हणजे शेतकऱ्याचं मरण असून सरकार आणि विमाकंपनी यांचं साटंलोटं आहे.असा घाणाघाती आरोप केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांच्यावर संघटनेच्या वतीने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहेत.

औसा येथील महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिरात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पीकविमा कंपनी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्या सह सर्व विभागप्रमुख आणि त्यांच्या अधिनस्त कर्मचारी उपस्थित होते. या समाधान शिबिरात केवळ तोंडाला पाने पुसण्याचे प्रयोग झाल्याचे दिसून येते. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांच्या लोककल्याणकारी राज्याच्या संकलनेत सामान्य माणूस हाच केंदबिंदू मानून गावगाड्यातल्या शेवटच्या माणसाचं समाधान झालं पाहिजे. हिच भूमिका महात्मा गांधींनी मांडून खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी झाली पाहिजेत असा आशावाद ठेवला होता परंतु आजच्या राज्यकर्त्याच्या निव्वळ हवेतील आत्मनिर्भर भारतच्या घोषनेने कुणाचं सुद्धा कल्याण होणार नसल्याची भूमिका शेतकऱ्याचा संघर्ष योद्धा रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र मोरे, सत्तार पटेल, अरुण दादा कुलकर्णी, नारायण नरखेडकर,मोहन चौरे, श्याम जाधव, अमर बिराजदार, ऍड सचिन धवन,गौतम कांबळे विवेक पाटील, बालाजी सूर्यवंशी, भरत पाटील सुरेश सूर्यवंशी, दगडू बरडे, आणि राजीव कसबे यांनी संपूर्ण राज्यात अनेक आंदोलनातून घेतल्याचे दिसून आलेले आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मागणी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा ३००० रू मानधन मिळावे,खरीप व रब्बी २०२३ चा पीकविमा त्वरित मिळावा यासह विविध मागण्या पावसाळी अधिवेशनात मांडून न्याय द्यावा अन्यथा औशात दिवसा मशाली पेटवून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनी दिला आहे.




# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दुधगावकर यांनी केला सौदागर यांचा सत्कार



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) - तुळजापूर येथील युवा लेखक व कवी देविदास सौदागर यांच्या उसवण या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी त्यांच्या घरी जावून कुटूंबासह सत्कार केला. यावेळी त्यांचा कुटुंबातील आई-वडील पत्नी यांचाही सत्कार केला. यावेळी तुळजापूरचे माजी नगराध्यक्ष तुळशीदास साखरे, संजय देवकते, अनिल जाधव, गणेश लोंढे, देविदास सौदागर यांचे वडील महादेव सौदागर, आई बालिका सौदागर, पत्नी वर्षा सौदागर आदी उपस्थित होते. यावेळी दुधगावकर म्हणाले की, काळजात लेण्या कोरताना हा कवितासंग्रह त्यांचा यापूर्वीचा कवितासंग्रह. शिलाई काम करता करता आपल्या मनातल्या सुखदु:खाच्या गोष्टी त्यांनी त्या कवितेत मांडलेल्या होत्या. अत्यंत उमदा असा कवी पुढे कादंबरीकडे वळला आणि त्यांनी उसवण ही कादंबरी लिहिली. त्या कादंबरीला आता साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही खूप अभिमानास्पद आणि अभिनंदनीय गोष्ट आहे. मराठवाड्यासाठी आणखीन एक शिरपेच रोवला गेला आहे. वीरा राठोड, रवी कोरडे यांच्यानंतर मराठवाड्याच्या वाट्याला आलेला हा तिसरा युवा साहित्य अकादमी पुरस्कार आहे.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जिवनाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे - पुजारी

नळदुर्ग दि.१८ (प्रतिनिधी) - ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित धरित्री विद्यालय नळदुर्ग आलियाबाद येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी ८० टक्के उपस्थिती होती. धरित्री विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. निसर्गाने जसे तुमचे पावसाच्या रूपाने स्वागत केले. तसे आम्ही तुमचे पुष्प, पाठ्यपुस्तक, देऊन स्वागत करीत आहोत या शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करा. आज जिकडे तिकडे मुलीचा दबदबा निकालात दिसत असल्यामुळे मुलांनी सुद्धा अभ्यासात स्वतःला गुंतून घ्यावे. शाळेला नेहमीच उपस्थित रहावे, अभ्यास करावा, शाळेतील जास्तीच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे प्रगती होत नसते. त्यासाठी विद्यार्थांच्या सर्वांगिण शैक्षणिक जिवनाचा विकास झाला पाहिजे आसे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक , महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनिल पुजारी यांनी केले .विद्यालयात दर्जेदार उपक्रम राबवले जातात दहावी परीक्षेत विद्यालयाने उज्वल यश संपादन केले आहे. शाळेचे वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे. असे प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी केले आहे

शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा ही दिल्या.



## घावांचे घाव

घातलेल्या घावांचे घाव,
सांग होतील नष्ट कसे?
तुझ्या हातातले हत्यार,
देतील पुराव्याचे ठसे.
हासूनी गोड भुलतील सारे;
हा भ्रम तु सोड गडे,
वेडी दुनिया,वेडा समाज,
हा भास तूझाच गळफास खरे.
कुठे थांबशील दुर्योधना?
शमलीच नाही अजून का,
ती गरळ,जी पेरली गांधारीने,
तिचेच नेत्र घेतील बळी तुझा का?
कृष्ण बोलतो कळवळ्याने,
तुझाच अंत तु का लिहतो गडे,
बघ झुकुनी एकदा आत तू,
तुझ्यासारखा दंभी दुसरा नसे.



अॅड.रजनी गिरवलकर
मो.नं.९८९०९५९५९४


## टी. सी हरवली आहे

सतीश रत्नप्पा धनोरे या नावाची जनकल्याण माध्यमिक विद्यालय हरंगुल १० वी पासची टी. सी ८-६-२०२४ रोजी गातेगाव प्रवासात हरवली आहे कृपया कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**मोबा-७८७५४३९९८२**

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER SHAIKH PARVIN MAULAALI TO : PARVIN MAULASAB SHAIKH HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE PARVIN MAULASAB SHAIKH IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME**
SHAIKH PARVIN MAULAALI
**NEW NAME**
PARVIN MAULASAB SHAIKH
**ADDRESS**
NEAR BHAIRAVNATH MANDIR,
INDIA NAGAR, LATUR
DIST LATUR, MAHARASHTRA, 413512

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : KHATIB SYED IFTEKHAR SYED USMAN TO : SAYED IFTEKHAR USMAN KHATIB HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SAYED IFTEKHAR USMAN KHATIB IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME**
KHATIB SYED IFTEKHAR SYED USMAN
**NEW NAME**
SAYED IFTEKHAR USMAN KHATIB
**ADDRESS**
NEAR BOON ENGLISH SCHOOL,
AYESHA COLONY,, MAHEBOOB NAGAR
LATUR DIST LATUR, MAHARASHTRA, 413512

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : MAULAALI JAMAL SHAIKH TO : MAULASAB JAMALSAB SHAIKH HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE MAULASAB JAMALSAB SHAIKH IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

OLD NAME : -MAULAALI JAMAL SHAIKH
NEW NAME : - MAULASAB JAMALSAB SHAIKH
ADDRESS :- BHAIRAVNATH MANDIR, JWAL, INDIA NAGAR, LATUR
DIST LATUR, MAHARASHTRA, 41351

## जाहीर प्रगटन

विशेषतः मौ. चाकूर व तालुका चाकूर परिसरातील सर्व जनतेस या जाहीर प्रगटणाद्वारे सुचित करण्यांत येते की, श्री. शिवाजी परशुराम सुर्यवंशी रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांनी त्यांच्या मे. सुर्यवंशी डेव्हलपर्स, झरी रोड, चाकूर या व्यवसायासाठी रु. ४५,००,०००/- (अक्षरी पंचेचाळीस लाख रुपये) इतके कर्ज इंदिरा महिला नागरी सहकारी बैंक लि., लातूर शाखा चाकूर यांच्याकडे कर्ज मागणी केलेली आहे. सहकर्जदार सौ. गौकर्णा शिवाजी सुर्यवंशी रा. चाकूर यांची मौ. चाकूर ता. चाकूर जि. लातूर येथील जमीन गट क्रं. ३९७/१/१ मधील क्षेत्र ०० हे. ५२ आर आकार १ रु.१२ पैसेची जमीन ज्याची चर्तुसिमा पुर्वेस- बालाजी सुर्यवंशी यांची जमीन, पश्चिमेस- हसन कुबडे यांची जमीन, दक्षिणेस- शिवाजी व बालाजी सुर्यवंशी यांची जमीन, उत्तरेस- रोड, येणे प्रमाणे वरील चर्तुसिमेच्या आतील जमीन तारण देत आहेत. तरी सदर कर्जासाठी तारण म्हणून करण्यांत येणाऱ्या मिळकतीच्या गहाण खतास जर कोणाची कांही उजर, आक्षेप वा हरकत किंवा बक्षिसपत्र, खरेदीखत, कर्ज बोझा, कोणत्याही कोर्टातील वाद किंवा दावा प्रलंबीत असेल व सदर मिळकती हस्तांतरणाबाबत कसलाही करार, ठराव किंवा व्यवहार ठरला असेल वा झाला असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या मुदतीत आपण आपले उजर व आक्षेप जाहीर प्रकरण देणार यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात नोंदवावी व त्याची रितसर पावती घ्यावी. अन्यथा सदर मिळकत निरंक, निर्बंध समजण्यांत येईल. मुदतीनंतर येणारा आक्षेप विचारांत घेतला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक :- १८/०६/२०२४ जाहीर प्रगटन देणार,

तर्फे,

**अॅड. एस.टी. मोतीपवळे, देवघर निवास, विश्वशांती धाम मंदिरा जवळ, चाकूर मो.नं. ९४२२०७१६०३**

**इंदिरा महिला नागरी सह. बँक लि., लातूर शाखा : चाकूर ता. चाकूर जि.लातूर**

## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

बुधवार दि. १९ जून २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# तिरु नदी पात्रातील झाडाझुडपांमुळे हाळी-हंडरगुळीकरांना पुराचा धोका

## मोठी दुर्घटना घडल्यावरच संबंधित यंत्रणा घेणार का ॲक्शन ?

हंडरगुळी (प्रतिनिधी) संबंधित यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे हाळी- हंडरगुळी (ता.उदगीर) येथील तिरु नदीचे पात्र दुषित झाले आहे.तसेच या नदीत विविध जातीच्या झाडांनी आपले बस्तान मांडले असल्याचे चित्र दिसत आहे.यामुळे महापुराचा धोका निर्माण झाला आहे. आणि या नदीच्या दुरावस्थेबद्दल वेळोवेळी बातमीद्वारे आवाज उठविला तरीपण कुंभकर्णा पेक्षाही गाढ झोपलेल्या संबंधित अधिकारी महाशयाला जाग कांही येईना.आणि म्हणुन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असलेल्या मॅडम ह्या तरी या नदीपात्राची पाहणी करुन योग्य तो निर्णय घेतील.का? एखादी दुर्घटना घडल्यावरच त्यांच्यासह सं- यंत्रणा झोपेतुन उठणार . याकडे या गावांचे लक्ष लागले



आहे .

दरम्यान नदीपात्रात वाढलेल्या झाडी झुडपांमुळे पुरांचा धोका वाढला आहे व या नदी किनारी असलेल्या वस्ती मधील लोकांचे जिवन डेंजर झोन मध्ये आले आहे.यात शंका नाही .

हाळी-हंडरगुळीसह या परिसरातील असंख्य गावासह शेती करीता जिवनवाहिनी असलेल्या तिरु मं.प्रकल्पातील नदीपात्रात विविध प्रकारची झाडे,झुडपे वाढली आहेत. तसेच येथे सा.बां.जागेवर अतिक्रमण करुन थाटलेल्या अवैध मॉंस विक्री सेंटर्सवाले मॉंस,मटनाचे रक्त व वेस्ट साहित्य या पात्रात टाकतात.यामुळे हे पात्र दुषीत होऊन सर्वदुर दुर्गंधी पसरते. अशा या प्रकारामुळे तिरु नदी पात्राचे पाविञ्य धोक्यात आले आहे. या कारणांमुळे नदीला महापुराचा धोका निर्माण झाला असुन नदीतील अडथळ्यामुळे भविष्यात महापुराचा फटका परिसरातील घरांना बसणार ! अशी भिती जनता व्यक्त करत आहेत या जुन मध्ये आजवर चांगला पाऊस पडला असुन जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर २०२४ मध्ये ही मोठ्या पावसाचा अंदाज संबंधित खात्याचा आहे. तिरु नदीपात्रात लहान,मोठी हजारो झाडी झुडपे वाढल्याने या पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यासाठी मोठमोठे अडथळे तयार झालेत.यामुळे येत्या कांही दिवसात महापुर आला तर त्या पुराचे पाणी गावात विशेषत: नदीच्या किनारी असलेल्या घराघरांमध्ये घुसू शकते.आणि यामुळे मोठी दुर्घटना घडू शकते. म्हणुन याबद्दल वेळोवेळी पेपरातुन आवाज उठविला तरी पण याकडे संबंधित यंत्रणा लक्ष द्यायला तयार नाही.जिल्हा पुर नियंत्रण व दक्षता तसेच आपत्ती व्यवस्थापन संबंधी बैठकीत नदी लगतच्या वस्त्या व गावांना सावधानतेचा इषारा देण्या -पलीकडे जिल्हाधिकारी कार्यालय करते तरी काय?तसेच हाळी आणि हंडरगुळीत एखादी दुर्घटना घडावी. अशी इच्छा संबंधित यंत्रणेची आहे का?तसेच मंत्री संजय बनसोडे हे तरी याकडे लक्ष देतील का?असे प्रश्न येथील नदीपात्राची दुरावस्था बघून जनता विचारीत आहेत..

# महाराष्ट्र उदयगिरीत सुमित तांदळे यास एमएचटी- सीईटी परीक्षेत ९९.१५ टक्के गुण



उदगीर : महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र आरोग्य आणि तांत्रिक सामायिक प्रवेश परीक्षा २०२४ मध्ये महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये सुमित तांदळे ९९.१५, गुण घेऊन प्रथम, शिवानी नागुरे ९८.६७, तर ओमकार केंद्रे ९७.८गुण घेऊन महाविद्यालयात तिसरा आला तसेच शेख फरहात ९६.३६ नरवटे प्रतीक्षा ९४.७६ कांबळे व्यंकटेश ९४.५१ कासार उजमा ९३.९०, पाटील पृथ्वीराज ९३.८३, शेख सोहेल ९३.१८, तलवारे संध्याराणी ९२.४९ बोईनवाड शिल्पा ९२.८३ कोरपक वाड अनुज ९१, नागरगोजे यशराज ९१.१३, गुडे विष्णू ९१.७९मोरे ऋतुजा ९१.६६ साकोळकर आशितोष ९१.६१,, सुवर्णकार रूपाली ९१.२७, सूर्यवंशी स्वाती ९०.९९ राठोडे दानिश ९०.३९, मठपती आशिष ९०.१६ मनियार जुनेद ८९.२६, मुळे सुयश ८१.७६, सुधाकर राठोड ८१.४०, सूर्यवंशी आदित्य ८०.२३ वगदाळे योगीराज ८०.८६ यांनी गुण संपादन केले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी ,सचिव रामचंद्र तिरुके ,सहसचिव ड. एस. टी .पाटील व डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर ,प्रभारी प्राचार्य डॉ.आर. के. मस्के उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील,उपप्राचार्य एस.जी. कोडचे पर्यवेक्षक प्रा.जे.आर .कांदे, प्रा. टी.एन सगर,प्रा. एस .वी. मुडपे यांच्यासह सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



काशीपीठाचे जगद्गुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांचे हस्ते भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका सौ.मनिषा पाटिल यांचा सत्कार करण्यात आला यावेळी श्री गुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज.

# लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार

उदगीर / प्रतिनिधी- लग्नाचे अमिष दाखवून पिडीतेवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपीस १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा उदगीर जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ श्री. पी.डी. सुभेदार यांच्या न्यायालयाचा निकाल.

पोलीस स्टेशन उदगीर ग्रा. जि. लातूर घटनेची थोडक्यात हकिकत अशी की, पिडीत मुलीची व आरोपी प्रमोद भांगे यांची कॉलेजमध्ये असताना ओळख झाली होती. त्या ओळखीतून आरोपीने पिडीत मुलीला तुझासोबत लग्न करतो असे लग्नाचे अमिष दाखवून सन २०१३ पासून सन २०१५ पर्यंत वारंवार बलात्कार केला व पिडीतेला न कळू देता आरोपीने २८.०५.२०१५ रोजी दुस-या मुलीशी लग्न करुन घेतले त्यामुळे पिडीतेने उदगीर ग्रा. पोलीस स्टेशन येथे तकार दिली. त्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (एन) भादवि अन्वये गुन्हा नोंद करुन गुन्हयाचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक एस डी. जाधव यांनी केला. व दोषारोपपत्र मे. न्यायालयात दाखल केले.

उदगीर येथील मे. अति. जिल्हा सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होवून व सरकार पक्षाच्या वतीने एकुण १० साक्षिदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सरकार पक्षाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या साक्षिदारांच्या साक्षिपुराव्यांवर व कागदपत्रावरती तसेच सहा. सरकारी वकील श्री. शिवकुमार गिरवलकर यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पी.डी. सुभेदार यांनी सदरील आरोपी प्रमोद भांगे यास १० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/- रु. दंड तसेच दंड न भरल्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली

प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील म्हणून ॲड. शिवकुमार गिरवलकर यांनी काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी पो.हे.कॉ. ४८ अक्रम शेख यांनी सहकार्य केले.


**वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

**मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४००/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ganpat Sangappa Patil हे दिनांक २०.०५.२०२४ रोजी Sahyadri Hospital Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Sushila W/o. Ganpatrao Patil, Age 66 yrs, Occu. Household. Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
2) Jayprakash S/o. Ganpatrao Patil, Age 43 yrs, Occu. Agri, Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
3) Omprakash S/o. Ganpatrao Patil, Age 37 yrs, Occu. Agri, Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
4) Vrashali W/o. Anil Chavale, Age 47 yrs, Occu. Household, R/o. Ahmedpur Tq.Ahmedpur Dist.Latur
5) Vaishali W/o. Amit Siddeshware, Age 40 yrs, Occu. Household, R/o. Udgir Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद ५ हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Sushila W/o. Ganpatrao Patil | 66 | Wife |
| 2) | Jayprakash S/o. Ganpatrao Patil | 43 | Son |
| 3) | Omprakash S/o. Ganpatrao Patil | 37 | Son |
| 4) | Vrushali W/o. Anil Chavale | 47 | Daughter |
| 5) | Vaishali W/o. Amit Siddeshware | 40 | Daughter |

अर्जदार याने Ganpat Sangappa Patil या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु Ganpat Sangappa Patil यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १४/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २४/०७/२०२४

आदेशावरुन

(ए.बी.सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपिक
४ थे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे)
सहा.अधिक्षक,
४ थे सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर



तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.११/०६/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार मोमीन समीर अमीनसाब वय १९ वर्ष रा. केकतसिंदगी ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे केकतसिंदगी ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०५/०६/२००५ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील मोमीन समीर अमीनसाब यांचा जन्म दिनांक ०५/०६/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मोमीन समीर अमीनसाव यांचा जन्म दिनांक ०५/०६/२००५ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु मोमीन समीर अमीनसाब यांचा जन्म दिनांक ०५/०६/२००५ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय केकतसिंदगी ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ११/०६/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख ११/०७/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसिलदार जळकोट

प्रत:-
ग्रामपंचायत कार्यालय केकतसिंदगी यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट




उदगीरचे उपविभागिय अधिकारी सुशांत शिंदे यांचा दैनिक यशवंत उदगीर विभागीय कार्यालयाच्यावतीने वाढदिवसानिमित्य ग्रंथभेट व वटवृक्षाचे रोप देऊन शुभेच्छा देताना राम मोतीपवळे,रोहित मोतीपवळे.

# सैनिकी विद्यालयाचे एम एच टी सीईटी परीक्षेत घवघवीत यश

उदगीर / प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एम एच टी सीईटी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.





एम एच टी सीईटी परीक्षेचा निकाल दि. १६ जून २०२४ रोजी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत सैनिकी विद्यालयातून

पीसीएम ग्रुपमधून प्रथम रुपेश शिंदे ( ८४.३३) , द्वितीय शिवम यजगर (८०.९७), तृतीय रोहित पाटील (७५.३५) तर पीसीबी ग्रुपमधून प्रथम कृष्णा सोनाळे ७९.७५), व्दितीय अर्णव माडिबोयने (६९.६४), तृतीय प्रफुल्ल तायडे (६६.३५) या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावले आहेत.

या सर्वच यशस्वी विद्यार्थ्यांचे व यांना मार्गदर्शन करणारे प्राध्यापक विभाग प्रमुख प्रा. युवराज दहिफळे, प्रा. शिवाण्णा गंदगे, प्रा. प्रदीप कोठारे, प्रा. नितीन पाटील, सौ. सीमा मेहत्रे यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस बसवराज म. पाटील नागराळकर, उपाध्यक्ष चंदन पाटील नागराळकर, शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप पाटील नागराळकर, सहसचिव चेतन पाटील नागराळकर, प्राचार्य वसंत कुलकर्णी, पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत व पुस्तके वाटप

**माधव होनराव**

जळकोट : प्रतिनिधी- उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्ट्यानंतर जळकोट शहर व तालुक्यातील जि. प. व संस्थेच्या सर्व शाळांतील विद्यार्थांनी (ता.१५ रोजी ) शाळा गजबजल्याचे चित्र दिसले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली. तसेच मिठाई भरवत प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.





यामध्ये १) केंद्रीय प्राथमिक शाळा वांजरवाडा : येथे वृक्षारोपन, पाठ्यपुस्तक वितरण करत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप, पं. स. चे मा. सभापती बालाजी ताकबीडे, सरपंच अविनाश नळंदवार, पत्रकार विवेक पोतदार, विस्तार अधिकारी जयवंत कोनाळे व शिवकांत पटवारी, केंद्रप्रमुख माधव हंगरगे, मुख्याध्यापक तुकाराम चिखले, अल्लाउद्दीन चौधरी यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन मारुती आगलावे यांनी तर आभार नंदकुमार कंदरफळे यांनी मानले. यावेळी पुरस्कार प्राप्त पत्रकार विवेक पोतदार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

२) श्री संत गोविंद स्मारक विद्यालयास वांजरवाडा : येथे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री हाश्मी यांनी भेट दिली असता, त्यांचा सत्कार करून त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करून पुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी श्रीकांत कुलकर्णी, मु. अ. कदम जे. आर., माधव होनराव , बालाजी शिंदे, हल्लाळे जी. एम. ,बालाजी दहिफळे, राजूरे एम व्ही.आदी कर्मचारी उपस्थित होते.

३) श्री गुरुदत्त विद्यालय जळकोट : येथे शाळेच्या पहिल्या दिवशी पदार्पण केलेल्या सर्व चिमुकल्यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक हम्पल्ले डी.डी. , बिलापट्टे सर, भोसले सर, स्वामी सर, तोडकरी सर, पंडित मॅडम, बिरादार सर, गबाळे सर, राऊत सर,, केंद्रे सर, दिनेश सर,आडे सर आदी उपस्थित होते.

४) जि. प. प्रा. शा. केकतसिंदगी येथे पहिली प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने पुष्पहार घालून व मोफत पाठ्यपुस्तक देवून स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच बायनाबाई कांबळे, धनराज गोंड, राजेसाब तांबोळी , मुख्याध्यापक दिगांबर सूर्यवंशी, प्रकाश मरतुळे, संजय फुलारी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

५ ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा होकर्णा : येथे पहिली वर्गात नवीन प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख माधव हंगरगे, मुख्याध्यापक विजय कुमार तेलंग, गुरुनाथ हवा, संजय शिवणगे, नागेश गोविंदवाड, नवनाथ जाधव, विजय गोरे आदि उपस्थित होते.